











शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : ४७ • अंक : ५२ • कोल्हापूर ता. ०९ जानेवारी २०२०

Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS

## आम्ही भिडे

जानेवारी २०२०

४२ वा वार्षिक अंक














# NIKITA BOILERS

ISO 9001:2015 Company

(www.nikitaboilers.com) (nikitaboilers@gmail.com)

*__We__ introduce ourselves as pioneers and leading manufacturer of a system for Abatement of smoke produced from burning dead bodies on Wood-Pyres. Very first System of this kind was installed by us at Mumbai Jagannath ShankarSheth Hindu Cemetery, Chandanwadi, Marinelines, in 2001.*

*__Most__ of the equipment is made from long lasting Stainless Steel. The crux of the System is the Scrubber; here the Smoke is scrubbed with Water and Chemicals to remove solid particles and to absorb Carbon. The turbid-dirty water is filtered and reused for few cycles and then drained. The still hot but cleaner air is, then, let out at 100 feet height above ground through Chimmney. Thus most of the pollution is absorbed in water and remaining is let out high above, avoiding smoke accumulation at the Ground Level.*



*__The__ system is successful in reducing, 1000 milligrams per Meter Cube of particular matter down to less than 100 milligrams per Meter Cube of particulate.*

*__This__ system, being directly related to the health and wellbeing of the people, prompted many corporator's to get the System installed in their locality. Hence, starting from 201-Chandanwadi, we installed the System at over 8 sites in Mumbai and at nearly 18 sites in Pune (city) since 2013 (Starting with Vaikunthdham-Navi peth.)*

*__We__ have our own manufacturing, fabrication and testing facility for all components of the system, we also have the necessary man power and expertise, required for site installation till final commissioning along with expertise in system maintenance. The final Testing of the system is done by a Government approved laboratory under MPCB and CPCB guidelines. Test results have shown more than 95 percent reductions in the Concentration of Total Particulate Matter in the flue gas.*

**Factory & Head Office :** C-46, Sinnar-MIDC, Nashik - 422103.


**Mobile :** 9819233845 *(C.A. Bhide)*, 9869102884 *(A.P. Bhide)*.

शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक
प्राजक्त
संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी
वर्ष : ४७ • अंक : ५२ • कोल्हापूर ता. ०९ जानेवारी २०२०
Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

आम्ही भिडे





## विश्वस्त व कार्यकारी मंडळ

श्री. कुमार भिडे, अध्यक्ष/विश्वस्त
श्री. शशिकुमार भिडे, कार्याध्यक्ष/विश्वस्त
श्री. चंद्रकांत भिडे, कार्याध्यक्ष/विश्वस्त
श्री. प्रभाकर भिडे, उपाध्यक्ष/विश्वस्त
श्री. दिलीप भिडे, सेक्रेटरी/विश्वस्त
श्री. माधव भिडे, ट्रेझरर/विश्वस्त
ले.क.(नि.) सुनिल भिडे, जॉ.सेक्रेटरी/विश्वस्त
श्री. चिंतामणी भिडे, जॉ. ट्रेझरर/विश्वस्त
सौ. संपदा भिडे, विश्वस्त
श्री. प्रशांत भिडे, विश्वस्त
श्री. प्रदीप भिडे, विश्वस्त
श्री. शंतनु भिडे, स्वीकृत सदस्य
सौ. मेघना भिडे, स्वीकृत सदस्य

नित्युंदन गोत्रीय
भिडे प्रतिष्ठान
मुखपत्र
(खाजगी वितरण)
****
संस्था नोंदणी
क्रमांक
ई-२०१४० मुंबई

• **पुणे कार्यालय :**
ले.क. सुनिल वासुदेव भिडे
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४/९६५७५४१२३६

• **मुंबई कार्यालय :**
सौ. संपदा भिडे
ए-५०३, श्री साई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई ४०००२८. मो. ९८१९९५१३९१
e-mail : office@bhidekul.in
website : www.bhidekul.in

***संपादकीय..*** आज दि. ४ जानेवारी २०२० रोजी 'आम्ही भिडे'च्या ४२ व्या अंकाचे प्रकाशन पनवेल येथे भिडे कुल संमेलनात मान्यवरांच्या हस्ते होत आहे. दि. ४ व ५ जानेवारी ह्या दोन दिवशी उपस्थित मान्यवर, सर्व सभासद, आश्रयदाते व हितचिंतक, जाहिरातदार यांच्या उपस्थितीत संमेलन साजरे होत आहे. ह्या सर्वांचे भिडे प्रतिष्ठान शतशः ऋणी आहे.

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ही एक स्थिर आणि पारदर्शक संस्था असल्यामुळे संस्थेची उन्नती होत आहे. नुकत्याच केलेल्या घटना दुरुस्तीनंतर सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३ वर्षांचे ऐवजी ५ वर्षे केली. ही पाच वर्षांची मुदत २०२० मध्ये संपत असल्यामुळे नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया असल्यामुळे २०२० ची वार्षिक सभा महत्त्वाची ठरणार आहे. विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक, वैद्यकीय, पूर परिस्थितीने ग्रासलेल्या भिडे मंडळींना मदत, खेळासाठी प्राविण्य मिळविणाऱ्यांसाठी आर्थिक मदत दरवर्षी देत आहोत. २००८ च्या कुलवृत्त प्रकाशनानंतर खरंतर संस्थेची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली होती. परंतु सक्षम कार्यकारिणी, तुमच्यासारख्या प्रेम करणाऱ्या मंडळींची भक्कम साथ आणि सर्वश्री कुमारकाका, शशीकुमार, चंद्रकांतजी व प्रभाकरपंत ह्या ज्येष्ठांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे आजमितीला संस्थेचा आलेख नेहमीच चढता राहिला आहे. दरवर्षी संमेलन, वार्षिक सभा, व्याख्यान ह्या व्यतिरिक्त तरुणांसाठी सुद्धा उपक्रम राबवायचे आहेत. ह्या माध्यमातून आपल्याकडील मौलिक सूचनांचे स्वागत असेल. आज एकत्र येणे ही काळाची गरज आहे. सामाजिक बांधिलकीतून सांघिक कार्य व संघटन हे घटक महत्त्वाचे आहेत. निःस्वार्थीपणे कार्य करणाऱ्या कार्यकारी मंडळावर आपण वेळोवेळी विश्वास दाखविल्यामुळे काम करायला अधिक उत्साह येतो. वास्तविक सध्या कार्यरत असलेल्या ज्येष्ठ मंडळींना वयपरत्वे व प्रकृतीच्या कारणामुळे काम करणे शक्य होत नाही तरीपण नेटाने सर्वजण वाटचाल करीत आहेत हे कौतुकास्पद वाटते. ह्या संस्थेची उन्नती अधिक होण्यासाठी श्रीव्याडेश्वर व श्रीयोगेश्वरीचा वरदहस्त कायम राहो ही प्रार्थना !

सर्व जाहिरातदार, बॅनर्सदाते, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !

आम्ही भिडे अंक ४२ वा

संपादक : **श्री. शशिकुमार केशव भिडे**

कार्यकारी संपादक : **श्री. दिलीप भिडे**

| संपादक मंडळ : | सल्लागार मंडळ : |
|---|---|
| श्री. प्रभाकर भिडे | श्री. सुनील भिडे (अमेरिका) |
| ले.क. सुनील भिडे | श्री. के. मो. भिडे |
| श्री. राजेंद्र भिडे | श्रीमती शशिताई घुले |
| सौ. स्नेहल भिडे | डॉ. प्रतिभा भिडे |
| श्री. चिंतामणी भिडे | श्रीमती सुमती वा. भिडे |
| श्री. प्रदीप ज. भिडे | श्रीमती प्रतिभा भिडे |
| सौ. प्रिती भिडे | श्री. शंतनु नि. भिडे |
| श्री. विनायक भिडे | सौ. मेघना भिडे |

अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

**सहवेदना :** भिडे कुलातील ज्ञात व अज्ञात भिडे व्यक्तींचे निधन झाले त्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धा सुमने अर्पण करीत आहे.

१) श्री. मंदार उदय भिडे, देवरुख.

२) श्री. प्रभाकर शंकर भिडे, पुणे.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

## ले. क. सुनिल वासुदेव भिडे

१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४

**मुंबई कार्यालय : सौ. संपदा भिडे**

ए-५०३, श्री साई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम)
मुंबई-४०००२८. मो. ९८१९९५१३९१

## • अनुक्रमणिका •

विद्यार्थी गुणगौरव ........ ५
देणगीदारांची यादी ........ ८
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! ........ ९
प्रतिष्ठानचे पुरस्कार २०१८ ........ ११
ऋषितुल्य ! ........ २१
लेखन स्पर्धा : सानचाफा ........ १९
रामप्यारी ........ २०
पर्यावरण ........ २१
परीक्षा ........ २२
माझे माहेर ........ २३
नाडण कुलसंमेलन ........ २६
निसर्ग आणि आपण ........ २७
बहुरंगी दिवाळी ........ ३१
लेखन स्पर्धा : सायकल ........ ३१
गजाने केली मजा ........ ३२
अमिताभ नावाचं वलयं ........ ३३
एक साहस योग : गडाख ........ ३५
लेखन स्पर्धा : माझे पर्यावरण ........ ३६
पहिलं-वहिलं ........ ३६
मन वेधसे वेध ........ ३८
मंगळसूत्र ........ ४१
दुःख चांगले आहे ........ ४४
अंक परत येणारे पत्ते ........ ४६
कविता ........ ४६
नृत्यरूपी गणेश ........ ४९
गणपतीची मूळ आरती ........ ५०

## नम्र सूचना

ज्या कुलबंधू, भगिनींनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील व्यक्तींशी संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे तसेच एकाच नावाने एकाच पत्त्यावर अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.

दिलीप भिडे, पुणे -------- ९६५७५४१२३६
ले.क. सुनिल भिडे, पुणे --- ९६२३०१७४४४
प्रशांत भिडे, सातारा ------ ९४२३०३०५२७
प्रदीप ज. भिडे, डोंबिवली -- ९८९२५०४०४२

# विद्यार्थी गुणगौरव

## गट १ स्कॉलरशिप (८ वी) परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**कु. सोहिनी प्रसन्न जोगळेकर**



रत्नागिरी. ८६.८०% गुण. (एकूण गुण २८८ पैकी २५० गुण) सध्या रत्नागिरी येथे फाटक हायस्कूलमध्ये इ. ९वी मध्ये शिक्षण घेत आहे. रत्नागिरी येथे वडील श्री. प्रसन्न ह्यांचे औषधांचे दुकान व आई सौ. अर्चना ह्या त्यांच्या व्यवसायात मदत करतात.

## गट ३ इ. १०वी परीक्षेत ८०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**१) चि. सोहम प्रसन्न जोगळेकर**



रत्नागिरी ९६.२०% गुण.
(एकूण गुण ५०० पैकी ४८१ गुण.)
चि. सोहम इ. ११ वी शास्त्र शाखेमध्ये रोटरी इंग्लिश मिडियम स्कूल, खेड येथे शिक्षण घेत आहे. शिक्षण घेत असताना विविध परीक्षा देऊन स्पृहणीय यश मिळविले आहे. वडील श्री. प्रसन्न ह्यांचे रत्नागिरी येथे औषधांचे दुकान असून आई सौ. अर्चना ह्यापण पदवीधर आहेत. त्या औषध व्यवसायात मदत करतात. 'भिडे प्रतिष्ठान'च्या कार्यात सौ. अर्चना सक्रिय आहेत.


**२) चि. मृण्मय मंदार भिडे**



रत्नागिरी ९५% गुण
(एकूण गुण ५०० पैकी ४७५ गुण)
चि. मृण्मय सध्या इ. ११ वी मध्ये गरवारे महाविद्यालय, पुणे येथे शिक्षण घेत आहे. ह्याशिवाय पियानोच्या ५ परीक्षा आणि तबल्याच्या ४ परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. वाणिज्य शाखेत शिक्षण घेत आहे. त्याची भविष्यात सी.ए. होण्याची इच्छा आहे. त्याचे वडील श्री. मंदार हे एल.आय.सी.मध्ये नोकरी करतात. आई सौ. मिताली ह्या नृत्य पारंगत असून त्यांचे रत्नागिरी येथे क्लासेस असून नृत्यशिक्षिका आहेत. भिडे प्रतिष्ठानच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

**३) कु. जान्हवी श्रीपाद भिडे**

तळेगाव दाभाडे. ९४.६०% गुण
(एकूण गुण ५०० पैकी ४७३ (सीबीएससी)
कु. जान्हवी सध्या इ. ११ वी मध्ये शास्त्र शाखेमध्ये



इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे येथे शिकत आहे. इ. १० वी मध्ये तिचा शाळेत प्रथम क्रमांक आहे. भविष्यात एम.बी.बी.एस. होण्याची इच्छा आहे. वडील श्री. श्रीपादराव हे पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयामध्ये व्याख्याता (प्रोफेसर) आहेत व आई सौ. मृण्मयी तळेगाव दाभाडे येथे स्वतःचे दुकान चालविते.

**४) चि. आर्य अमित भिडे**



पनवेल. ९३.६०% गुण
एकूण गुण ५०० पैकी ४६८.
चि. आर्य सध्या इ. ११वी मध्ये शिकत आहे. डीएव्ही पब्लिक स्कूल, न्यू पनवेल येथून त्याने इ. १०वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

## गट ४ इ. १०वी शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**चि. सोहम प्रसन्न जोगळेकर**



रत्नागिरी. एकूण ९६.२०% गुण.
श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी मुंबई पुरस्कृत, कै. श्रीपाद सखाराम भिडे यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक.

फरसाण, मिठाई, श्रीखंड, बासुंदी, गुलाबजाम
अशा चविष्ट-दर्जेदार-वैविध्यपूर्ण पदार्थांची
१०० वर्षांची 'गोड परंपरा'

Franchisees of अनंत हलवाई
All types of Sweets

स्वादिष्ट रुचकर घरगुती
पुरणपोळी

गुळ पोळी, उकडीचे मोदक, चिवडा, शंकरपाळे,
भाजणीची चकली, स्पे. बेसन लाडु व इतर पदार्थ

कनक KANAK ORGANIC Fresh & Healthy

शुद्ध, ताज्या व नैसर्गिक भाज्या,
फळे आणि कडधान्ये

Instant TEA & COFFEE
GeeBees
Golden Beverages

इंन्स्टंट चहा, कॉफी, केशर इलायची
उकाळा तसेच इंन्स्टंट टोमॅटो सूप
व मंच्याव सूप मिळेल.

DHANWANTARI
DISTRIBUTORS PVT. LTD.
Ayurvedic Food Products

रोग्यांना निरोगी करणारी आणि
निरोग्यांना अधिक उत्साही करणारी

आनंदी उत्साही मन,
सक्रीय निरोगी तन,
उत्सव असो वा सण,
सुंदर-सुगंधी क्षण!



संस्थापक-मालक-चालक
श्री मोहन भिडे 'आपला गोड मित्र'
९८२० ४५१ ३४४


Sweet Family Friend!
KANAKENTERPRISES
Everest Shopping Center
Opp. Railway Station, Dombivli-W
0251-2480 394

कनक

ugamcreative.in

### गट ५ — इ. १२वी उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी


**चि. अथर्व नभडे,**



रत्नागिरी. ९६.४६% गुण
(एकूण ६५० पैकी ६२७ गुण)
डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली पुरस्कृत, कै. के. वि. तथा दादुकाका भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक.

### गट ६ — उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत कोकण विभागातून सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी


**चि. अथर्व विवेक भिडे,**



रत्नागिरी. ९६.४६% गुण.
(६५० पैकी ६२७ गुण.)
श्रीमती मंजिरी माधव भिडे, पुणे पुरस्कृत, कै. माधव उर्फ नंदू दत्तात्रय भिडे, माभळे, संगमेश्वर यांचे स्मरणार्थ

### गट ७ — इ. १२वी उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत ८०% पेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**चि. अथर्व विवेक भिडे**



रत्नागिरी ९६.४६% गुण.
(६५० पैकी ६२७ गुण)
सध्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँण्ड रिसर्च पुणे (IISER) येथे शिकत आहे. जेईई (मेन) ९९.२२%, जेईई (अँडव्हान्स) १००८९ रँक आणि सीईटी ला ९९.९८% गुण प्राप्त केले. वडील विवेक रत्नागिरीमध्ये शिक्षक असून आई जान्हवी गृहिणी आहे.

**२) कु. सुप्रिता प्रसन्न भिडे**



मुंबई ८१.३८% गुण. (६५० पैकी ५२९ गुण.)
कु. सुप्रिता सध्या मुंबई येथील चेंबूरमध्ये स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये पदवी अभ्यासक्रम पूर्ण करीत आहे. वडील श्री. प्रसन्न हे मुंबई येथे एका कंपनीत सर्व्हिस मॅनेजर आहेत आणि आई सौ. सुजाता ह्या गृहिणी आहेत.

### गट ८ — इ. १० वी शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**चि. आर्य अमित भिडे,**



पनवेल. (मराठी पारितोषिक)
मराठी विषय १०० पैकी ९६ गुण.
श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, अंमळनेर पुरस्कृत त्यांची आई कै. सिंधु दत्तात्रय भिडे यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक

### गट ९ — इ. १० वी शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**चि. सोहम प्रसन्न जोगळेकर**



रत्नागिरी. (संस्कृत पारितोषिक)
संस्कृत विषय १०० पैकी १०० गुण.
कै. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई पुरस्कृत हे पारितोषिक.

**साद–प्रतिसाद :** श्री. मिलींद दिगंबर भिडे (छत्तीसगड) यांनी आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या कन्येच्या विवाहासाठी रु. १० हजार आर्थिक मदत प्रतिष्ठानकडे जमा केली आहे. त्यानुसार भिडे कुलोत्पन्नातील व्यक्तीने प्रतिष्ठानकडे संपर्क करावा. (९६५०७५४१२३६)

**गट १०** इ. १० वी शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी

**चि. सोहम प्रसन्न जोगळेकर**



रत्नागिरी. (इंग्रजी पारितोषिक)
इंग्रजी विषय १०० पैकी ९५ गुण.
सौ. स्नेहा रमेश आपटे, पुणे पुरस्कृत, त्यांचे वडील कै. दत्तात्रय विनायक भिडे, अंमळनेर यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक.

**गट १३** श्री.प्रदीप वासुदेव भिडे व डॉ. सौ. शीला प्रदीप भिडे, दिल्ली परस्कृत विद्यार्थी/विद्यार्थिनीं-साठी विनापरतफेड आर्थिक मदत

| | |
|---|---|
| १) कु. चैताली संजय भिडे, सांगली | रु. ३०,००० |
| २) कु. समिधा मुकुंद भिडे, चिपळूण | रु. ३०,००० |
| ३) कु. करुणा दिपक भिडे, डोंबिवली | रु. १०,००० |
| ४) कु. अश्विनी अशोक भिडे, पुट्टूर कर्नाटक | रु. ३०,००० |
| ५) कु. आस्था केदार भिडे, पुणे | रु. १०,००० |

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ पर्यंतचे देणगीदार

**देणगी : रु. ५,०००**

१) श्री. अनिरुद्ध (मंदार) वि. भिडे, पनवेल
२) श्री. महेश मनोहर भिडे, पनवेल
३) श्री. मंदार भिडे, पनवेल
४) श्री. सुनिल भिडे, पनवेल
५) श्री. चित्तरंजन भिडे, पनवेल
६) श्री. विश्वास भिडे, पनवेल
७) श्री. रमेश भिडे, पनवेल
८) श्री. विनय भिडे, पनवेल
९) श्री. उमेश भिडे, पनवेल
१०) श्री. विजयकुमार भिडे, पनवेल
११) सौ. गार्गी भिडे, पनवेल
१२) श्री. विजयराव भिडे
१३) श्री. अरविंद भिडे, पनवेल
१४) श्री. मोरेश्वर भिडे, पनवेल

**देणगी : रु. २,०००**

१५) श्री. राजाराम शंकर गोरे, कोल्हापूर

**पुरस्कार देणगी : रु. २१,०००**

१६) श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे

**पुरस्कार देणगी : रु.१०,०००**

१७) श्रीमती सुमती वामन भिडे, पुणे

**शैक्षणिक देणगी : रु.११,०००**

१८) श्री. विजयराव रघुनाथ भिडे, ठाणे
१९) श्री. सुरेश रघुनाथ भिडे, ठाणे

**वैद्यकीय मदत : रु.१२,०००**

२०) श्री. श्रीधर विनायक भिडे, बोरिवली

**वैद्यकीय मदत : रु. ५,१००**

२१) श्री. अनिल सुरेश भिडे, पुणे

**आजीव सभासद : रु. १,०००**

२२) सौ. मृणाल श्रीकांत केळकर, डोंबिवली
२३) सौ. मीना सु. पुरोहित, कोल्हापूर
२४) सौ. मधुरा महेश भिडे, पनवेल
२५) श्री. महेश मनोहर भिडे, पनवेल

# भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## जानेवारी

| | |
|---|---|
| १. श्री. श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा | १ |
| २. श्री. प्रभाकर शंकर भिडे, सोलापूर | १ |
| ३. श्री. विश्वनाथ दिवाकर भिडे, पुणे | १ |
| ४. श्री. केदार विनय भिडे, पुणे | १ |
| ५. श्री. वसंत मोरेश्वर भिडे, पुणे | ३ |
| ६. श्रीमती वीणा वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ७. श्री. चिन्मय श्रीकृष्ण भिडे, पुणे | ६ |
| ८. श्री. प्रभाकर महेश्वर भिडे, कणकवली | ६ |
| ९. श्री. कौस्तुभ प्रदीप भिडे, डोंबिवली | ६ |
| ९. श्री. गजानन सदाशिव भिडे, पुणे | ९ |
| ११. सौ. चित्रा विजय भिडे, भोपाळ | ११ |
| १२. श्री. संदीप कृष्णराव भिडे, बेळगांव | ११ |
| १३. श्री. प्रसन्न भास्कर भिडे, मुंबई | १२ |
| १४. सौ. सुकृता संदीप भिडे, अंमळनेर | १२ |
| १५. श्री. विलास विठ्ठल भिडे, देवगड | १३ |
| १६. श्री. मकरंद दत्तात्रय भिडे, पंढरपूर | १४ |
| १७. डॉ. विजय कृष्णा भिडे, भोपाळ | १५ |
| १८. सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे | १५ |
| १९. डॉ. विवेक यशवंत भिडे, रत्नागिरी | १६ |
| २०. श्री. कैलास जगदीश भिडे, मुंबई | १९ |
| २२. श्री. नारायण वसंत भिडे, जबलपूर | २० |
| २२. श्री. मंदार श्रीकृष्ण भिडे, पुणे | २२ |
| २३. सौ. विद्या विकास भिडे, सांगली | २२ |
| २४. श्री. उमेश विठ्ठल भिडे, ठाणे | २३ |
| २५. श्रीमती कुसुम नारायण नगरकर, पुणे | २४ |
| २६. श्री. प्रतापसिंह विष्णुपंत भिडे, नाशिक | २४ |
| २७. सौ. विद्या चिंतामणी भिडे, ठाणे | २५ |
| २८. श्री. विलास राजाराम भिडे, मुंबई | २५ |
| २९. श्री. मधुकर शंकर भिडे, रायगड | २६ |
| ३०. सौ. मनाली मंदार भिडे, पुणे | २८ |
| ३१. श्री. परीक्षित सुहास भिडे, पुणे | ३० |
| ३२. श्री. मधुकर गोविंद भिडे, गुजराथ | ३१ |

## फेब्रुवारी

| | |
|---|---|
| १. कु. राजस प्रदीप भिडे, पुणे | २ |
| २. श्री. संजय दत्तात्रय भिडे, कोल्हापूर | ३ |
| ३. श्री. सारंग शरद भिडे, पुणे | ५ |
| ४. श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी | ७ |
| ५. श्री. विजय अरविंद भिडे, पुणे | ८ |
| ६. श्री. शरद नारायण भिडे, पुणे | ९ |
| ७. सौ. गौरी श्रीगणेश जोगळेकर, कल्याण | ९ |
| ८. श्री. निनाद दत्तात्रय भिडे, ठाणे | ९ |
| ९. कु. ईरा हर्षवर्धन भिडे, पुणे | १० |
| १०. श्री. विश्वनाथ रघुनाथ भिडे, कामशेत | १० |
| ११. सौ. मृणाल शार्दुल भिडे, पुणे | १२ |
| १२. श्री. वसंत रामकृष्ण भिडे, पुणे | १३ |
| १३. सौ. सुजाता प्रसन्न भिडे, मुंबई | १३ |
| १४. सौ. कल्पना संजय भिडे, माणगांव | १५ |
| १५. श्री. विकास कृष्णाजी भिडे, कल्याण | १५ |
| १६. श्री. प्रसाद प्रसन्न भिडे, पुणे | १५ |
| १७. सौ. गौरी हर्षवर्धन भिडे, पुणे | १७ |
| १८. श्री. उदय गजानन भिडे, देवरुख | १७ |
| १९. श्री. श्रीराम वामन भिडे, पुणे | १८ |
| २०. श्री. अमित प्रकाश भिडे, डोंबिवली | १८ |
| २१. श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे | १९ |
| २२. श्री. विनायक केशव भिडे, रायगड | २० |
| २३. श्री. संतोष सखाराम भिडे, डोंबिवली | २० |
| २४. श्री. सागर गजानन भिडे, सांगली | २० |
| २५. श्री. वसंत नरहर भिडे, ठाणे | २१ |
| २६. श्रीमती सुलभा दिनकर भिडे, कल्याण | २२ |
| २७. श्री. प्रकाश प्रभाकर भिडे, माभळे | २३ |
| २८. श्री. बाळकृष्ण दामोदर भिडे, पुणे | २४ |
| २९. सौ. मानसी मुकुंद भिडे, बेळगांव | २५ |
| ३०. श्री. माधव आनंद भिडे, डोंबिवली | २५ |
| ३१. सौ. आकांक्षा आशिष भिडे, नालासोपारा | २६ |
| ३२. श्री. विक्रांत दिलीप भिडे, पुणे | २७ |
| ३३. ॲड. विनोद यशवंत भिडे, औरंगाबाद | २७ |
| ३४. श्री. आशिष धुंडिराज भिडे, नालासोपारा | २८ |

## मार्च

| | |
|---|---|
| १. श्री. प्रसाद रमेश भिडे, कल्याण | १ |
| २. सौ. अंजली विवेक भिडे, सांगली | २ |
| ३. कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रोहा | ४ |
| ४. सौ. प्रज्ञा संतोष भिडे, ठाणे | ४ |
| ५. सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर | ५ |
| ६. श्री. काशिनाथ लक्ष्मण भिडे, सोलापूर | ७ |
| ७. श्री. अमित ए. भिडे | ७ |
| ८. श्री. मिलींद मुकुंद भिडे, पुणे | ७ |
| ९. श्री. सुधीर केशव भिडे, पुणे | ८ |
| १०. सौ. शकुंतला मधुकर भिडे, रायगड | १० |
| ११. श्री. विश्वनाथ गोविंद भिडे, पुणे | ११ |
| १२. कु. वेदांगी दिलीप भिडे, पुणे | १४ |
| १३. सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे | १५ |
| १४. श्रीमती वनिता नरसिंह भिडे, पुणे | १५ |
| १५. श्री. बाळकृष्ण ल. भिडे, कर्नाटक | १६ |
| १६. श्री. सुदर्शन सुरेश भिडे, पुणे | १६ |
| १७. श्री. शरद शंकर भिडे, सांगली | १७ |
| १८. श्री. सुनील वामन भिडे, पुणे | १७ |
| १९. सौ. अनुराधा नरेंद्र भिडे, सांगली | १८ |
| २०. श्री. संजय भिडे, मुंबई | १९ |
| २१. श्री. शिरीष सुरेश भिडे, उत्तरप्रदेश | २० |
| २२. श्री. दीनानाथ पांडुरंग भिडे, गुजराथ | २३ |
| २३. श्री. एम. उपेंद्र भिडे, बेंगलोर | २४ |
| २४. श्री. मा. य. भिडे, हैद्राबाद | २५ |
| २५. श्री. अक्षय चारुदत्त भिडे, माभळे | २७ |
| २६. सौ. स्वाती अजय भिडे, पुणे | ३० |
| २७. सौ. आशा अनिल भिडे, भोपाळ | ३० |
| २८. श्री. महादेव जनार्दन भिडे, मुंबई | ३० |
| २९. श्री. अभिषेक विजय भिडे, पनवेल | ३१ |
| ३०. सौ. राधिका श्रीधर रानडे, पुणे | ३१ |
| ३१. श्री. अमोल शशिकांत भिडे, पुणे | ३१ |

# Savita Bhide & Company

*...we do more for your money*

*We are a Client focused company offering multiple Financial Services under Single roof.
We enjoy a Strong Reputation built over 30 years and fostered by the Trust of our Customers
Our Industry Knowledge and our Competencies drive our end to end
Execution Capabilities and enable us to provide Best Services to our Clients.
Savita Bhide & Company offers personalized Financial services across segments like*

- **Portfolio Investment Services**- Aligned to your needs, risk appetite and expected returns. We help you plan for your short term and long-term goals by recommending the right investments
- **Mutual Fund Investments** -Make your money work for you. Expert guidance from our Financial Planners to help you invest in the right mix of Savings, Income and Wealth creation Funds
- **Insurance Advisory for Life and Health Insurance** - Trusted agents for LIC, Birla Sunlife, Max Bupa, United India we offer specialized advice and guidance tailored to meet individual requirements
- **Tax Consultancy**- Financial experts well versed in Individual and Business Taxation laws can guide you on how to minimize taxation while remaining compliant with the law
- **Real Estate Advisory**- Based on years of market research. We find genuine buyers, sellers and tenants for your property and hand hold you until the transaction is complete
- **Home loans, Mortgage loans, Balance transfer, Education loans** etc. Our tie-up with HDFC, Bank of Baroda, PNB Housing, Tata Capital etc. facilitates paper work and ensures fast approvals
- **Legal Documentation Services**- Our Legal team helps with drafting of Sale Deeds, Gift Deeds, Power of Attorney, Will and other Title documents and Agreements
- **Interior Designing and Landscaping**- Solutions for Residential and Commercial properties. Consultancy and Execution from our Architect to suit your lifestyle and meet your budget - Ketaki Bhide +919881740231

**Reach us at**
**1697, Sadashiv Peth, Khajina Vihir Chowk,**
**Near Shailesh Raswanti Gruha, Pune 411030.**
**Ph.: (O) 020-24472316, (R) : 020-24354353 | E-mail : bhidesatish@yahoo.co.in**

Satish Bhide
M 9822048661

Aditya Bhide
M 9850559397

# प्रतिष्ठानचे पुरस्कार २०२०

## साहस/क्रीडा पुरस्कार २०२०

### कु. भाग्यश्री मंदार भिडे, डोंबिवली

श्री. रा. म. भिडे, पुणे पुरस्कृत श्रीकृष्ण महादेव स्मृती क्रीडा पुरस्कार २०२० पनवेल येथे होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात प्रदान करण्यात येत आहे. कु. भाग्यश्री ही डोंबिवली येथे स्थित असून सौ. मोहिनी व मंदार भिडे यांची फक्त १४ वर्षांची ज्येष्ठ कन्या. भाग्यश्री कराटे, स्केटींग आणि भरतनाट्यम अशा विविध गोष्टी शिकत आहे. आतापर्यंत तिला कराटेमध्ये ३ सुवर्ण, ३ रौप्य आणि स्केटींगमध्ये ३ सुवर्ण, ६ रौप्य पदक आणि १ कास्य पदक मिळाली आहेत. पुणे येथे सलग ५ तास स्केटींग स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळाले आहे. जूनमध्ये झालेल्या इंडिया बुक रेकॉर्ड, एशिया बुक रेकॉर्ड, इंडियन यंग ॲचिव्हर रेकॉर्ड, बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड, ग्लोबल रेकॉर्ड, एशिया पॅसिफिक रेकॉर्ड, नॅशनल रेकॉर्ड व चिल्ड्रन रेकॉर्ड ह्या ८ रेकॉर्डसाठी तिचं नाव रजिस्टर झाले आहे. ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१९ ह्या कालावधीत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करिता स्केटींगसाठी तिची नोंद झाली आहे. कराटेमध्ये सुद्धा तिला राष्ट्रीय स्तरावर रौप्य पदक मिळाले आहे. मॅरेथॉनमध्ये शालेय स्तरावर सलग तीन वर्षे सुवर्णपदक मिळालेली आहेत. विशेष म्हणजे तिच्या दोन लहान बहिणीसुद्धा खेळामध्ये अशाप्रकारे प्राविण्य मिळवित आहेत. मुलींना जगवा, मुलींना शिकवा आणि सक्षम करा हे अगदी सत्य आहे. कु. भाग्यश्री सांगते की, माझ्या आई, वडील व गुरूंचा माझ्या यशामध्ये मोलाचा वाटा आहे. तिच्या भावी यशासाठी हार्दिक शुभेच्छा आणि आशीर्वाद.



## संस्कृत पुरस्कार २०२०

### श्री. अंकुश अतुल भिडे, पनवेल

श्रीमती सुमती वामन भिडे आणि कै. वामनराव वि. भिडे, पुणे पुरस्कृत त्यांचे बंधू कै. डॉ. विद्याधर विश्वनाथ भिडे, पुणे यांचे स्मरणार्थ संस्कृत पुरस्कार - २०२० पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्री. अंकुश भिडे रामनरेन रुईया कॉलेज, माटुंगा येथून संस्कृतमध्ये बी.ए. आहेत. इ. १० वी शालांत परीक्षेत संस्कृतमध्ये ९९ गुण मिळविले. टी.वाय.बी.ए.ला 'ओ' श्रेणी मिळवून संपूर्ण संस्कृत विषयामध्ये पदवी शिक्षण पूर्ण केले. त्याचप्रमाणे The creation of the universe Rugveda to Quantum Physics Research पेपर सादर केला. केवळ संस्कृत विषय घेऊन नोकरी मिळेल का ? ह्या प्रश्नामुळे केवळ संस्कृत ह्या विषयाला धरून आपणही प्रशासनाचा एक अंग होऊ आणि शासन, प्रशासन ह्या पातळीवर जाऊन खऱ्या अर्थाने संस्कृतचा प्रचार, प्रसार व संवर्धन करण्याचा मानस आहे. संस्कृत भाषेचे अस्तित्व हे तिच्या लवचिकतेवर व ज्ञानाच्या सुसंगतीवर अवलंबून असते. ह्या अनुषंगाने प्रशासनामध्ये विशेषतः महाराष्ट्रात एम.पी.एस.सी. किंवा यू.पी.एस.सी. परीक्षांच्या माध्यमातून structural reform करण्याची आवश्यकता आहे. त्याच दिशेने पुढे जाऊन एम.ए. पीएच.डी. करण्याचा मानस आहे. संस्कृत भाषेतून ज्ञान घेऊन देशाचा व भावी पिढीचा इतिहास उज्ज्वल घडविण्याच्या त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.



## आदर्श कार्यकर्ता पुरस्कार - २०२०

### श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे

कै. दामोदर तथा दामुकाका केशव भिडे, डोंबिवली यांचे स्मरणार्थ त्यांची कन्या सौ. नेहा किरण सातर्डेकर, डोंबिवली पुरस्कृत 'आदर्श कार्यकर्ता - पुरस्कार २०२०' पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्री. विनायक यांचे शिक्षण एस.एस.सी., २ वर्षांचा फोटोग्राफी डिप्लोमा, ५ वर्षांचा जी.डीआर्ट डिप्लोमा. विद्यार्थी दशेत असताना on the spot compitition, बेस्ट स्टुडंट अशी बक्षीसे मिळविली. इ. ९ वी मध्ये विविध विषय



विशेष सहकार्याचे प्रशस्तीपत्रक न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे ह्या शाळेत मिळालेला विद्यार्थी. १९८८ ते १९९१ ही ३ वर्षे हडपसर येथे नोकरी. अक्षर रचना हे मासिक ३ वर्षे एक हाती सांभाळले. २००६ मध्ये 'तैत्तिरीय संहिता' ह्या खंडाचे डी.टी.पी. काम पूर्ण केले. रोटरी क्लब, ए.एम. ट्रान्सपोर्ट, एम.बी. चितळे कन्स्ट्रक्शन्स तसेच भोसरी व आकुर्डी येथील इंडस्ट्रीजची डिझायनिंग व प्रिंटिंगची कामे केली. नारायण पेठ माती गणपतीमध्ये रांगोळी स्पर्धा परीक्षक म्हणून १ वर्ष काम केले. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये २००८ पासून सक्रिय सहभाग, 'आम्ही भिडे' अंकाचे डीटीपी, प्रिंटिंगची कामे ५ ते ६ वर्षे करीत होते. प्रतिष्ठानचे कोणतेही डीटीपी कामासाठी २४ X ७ म्हणजे विनायक असे म्हणणे वावगे ठरणार नाही. विनायकरावांचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतेही काम सांगितले तरी त्यांचा प्रथमदर्शनी 'हो' हा शब्द असतो. करतो, होईल हे शब्द असतात. त्यामुळे कधी कधी काम वेळेवर जरी झाले नाही तरी थोडे उशिरा का होईना पण काम होणार हे मात्र निश्चित असते. अशा ह्या शांत व संयमी स्वभावाचा आदर्श त्यांनी आम्हा कार्यकर्त्यांसमोर ठेवला आहे. २००८ च्या कुलवृत्त आवृत्ती प्रकाशनाचे वेळेस त्यांचे घर म्हणजे फक्त प्रतिष्ठानकरिताच आहे अशीच परिस्थिती होती. असे विनायकरावांसारखे कार्यकर्ते प्रतिष्ठानला लाभल्यामुळे प्रतिष्ठानचा आलेख नेहमीच चढता राहिला आहे. त्यांना उत्तम आरोग्य आणि बळ लाभो हीच आमची सदिच्छा.

## उद्योजक पुरस्कार २०२०

### श्री. महेश मनोहर भिडे, पनवेल

श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत त्यांचे वडील कै. विष्णुपंत तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ 'उद्योजक पुरस्कार - २०२०' पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्री. महेश यांचे शिक्षण बी.ए., डी.आय.टी., आय.टी.आय. आहे. १९९६ ते २०१२ पर्यंत १६ वर्षे हिंडाल्को इंडस्ट्रीज, तळोजा, पनवेल येथे नोकरी. २०१२ ते २०१६ ४ वर्षे भारताबाहेर कतालुम इंडस्ट्रीज,



कतार येथे नोकरी. ॲल्युमिनियम इंडस्ट्रीजमध्ये २० वर्षांचा अनुभव पाठीशी घेऊन आणि एअर कंडिशनर क्षेत्राची माहिती असल्यामुळे आणि स्वतःचा नवीन व्यवसाय सुरू करायचा असे ठरवून जानेवारी २०१७ पासून 'शितलसेवा' एसीएएमसी ॲण्ड सर्व्हिसेस ह्या नावाने पनवेल येथे व्यवसाय सुरू केला. नवीन एसी बसविणे, रिपेअरिंग आणि त्या संबंधी सर्व सर्व्हिसेस पुरवितो. वास्तविक एअर कंडिशनर ह्या क्षेत्राची थोडी माहिती असल्याने धाडसाने हे आव्हान स्वीकारले आहे. त्याप्रमाणे हे आव्हान पेलायचेच असा मनोनिग्रह केला आहे. वास्तविक ह्या क्षेत्रामध्ये मर्यादा असल्या तरी चिकाटी व सचोटीने काम करण्याची हातोटी असल्याने ह्या व्यवसायात हळूहळू जम बसतो आहे. सरतेशेवटी ते सांगतात नोकरीमध्ये आठ तास काम करून जो आनंद मिळत होता त्यापेक्षा स्वतःच्या व्यवसायात दिवसरात्र काम करण्यात जो आनंद मिळतो तोच आनंद अधिक ऊर्जा देऊन जातो. अशा ह्या हरहुन्नरी उद्योजकाला भावी यशासाठी मनोमन शुभेच्छा.

## कला पुरस्कार - २०२०

### श्री. अनिरुद्ध (मंदार) विश्वास भिडे, पनवेल

श्री. कुमार विष्णू भिडे आणि श्री. वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत त्यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ 'कला पुरस्कार - २०२०' पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्री. अनिरुद्ध हे स्वतः पेशाने वकील असून सुद्धा ह्या क्षेत्राकडे वळले. त्यांचे शिक्षण बी.एस्सी., एल.एल.बी. आहे. वडील कै. विश्वासराव व आई वृषाली हे गुरू स्थानी आहेत. सौ. उपाध्ये व श्री. नंदू कर्वे, पं. दिनकर पणशीकर, पं. नारायण बोडस, पं. मधुबुवा जोशी ह्यांचेकडे प्राथमिक शास्त्रीय संगीत झाले. संगीतकार यशवंद देव यांचेकडे १० वर्षे सुगम संगीत तसेच गजानन वाटवे, प्रभाकर जोग, दशरथ पुजारी ह्या दिग्गजांकडून मार्गदर्शन मिळाले. २००४ सालापासून श्रीनिवास खळे, पुजारीसर, यशवंत देव यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसह त्यांचेवरील गीतांचे कार्यक्रमांचे सादरीकरण केले. बाबूजींच्या ई-टीव्ही वरील श्रोत्यांच्या हृदयातील बाबूजी या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग. पं. उपेंद्र भट यांच्याबरोबर संवादिनी साथ संगत केली. संगीतकार यशवंत देव यांच्याबरोबर तबल्याची साथसंगत. सह्याद्री वाहिनी करिता 'कानडा राजा पंढरीचा' या विठ्ठलावरील लघुपटासाठी संगीतकार म्हणून काम केले. गणेशपुरी येथील नित्यानंद महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपटाला संगीत दिले. पनवेल, पेण, अलिबाग, महाड, माणगांव ह्या परिसरात 'सामगंध पनवेल' ह्या नावाने गायन व तबल्याचे वर्ग तसेच शास्त्रीय व सुगम संगीत वर्गाचाही समावेश आहे. गेली ३ वर्षे हाँगकाँग येथून काही चिनी विद्यार्थी सुद्धा अल्प अवधीसाठी गायन शिकायला येतात. वास्तविक वकील असून सुद्धा आणि पनवेलसारख्या ठिकाणी ह्या व्यवसायात जम बसलेल्या ह्या तरुणाला गाणं आणि संगीत हेच ध्येय गाठायचे आहे. आपल्या आवडीचा आणि गोड आवाजाचा उपयोग करून घेऊन आपल्या गायकीने रसिकांना मंत्रमुग्ध करणारा हा गंधर्व आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांची मनोकामना पूर्ण होवो हीच प्रार्थना.



## वैदिक पुरस्कार २०२०

### श्री. राहुल मुकुंद भिडे, चिपळूण

श्रीमती सुमती वामन भिडे आणि कै. वामनराव वि. भिडे, पुणे पुरस्कृत त्यांचे वडील अहिताग्नी विश्वनाथ नारायण आणि आई कै. दुर्गाबाई भिडे यांचे स्मरणार्थ 'वैदिक पुरस्कार - २०२०' पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्री. राहुल भिडे गुरुजींनी यशवंतराव मुक्त विद्यापीठातून बी.ए. पदवी संपादन केली आहे. पुणे वेदपाठशाळा येथे कृष्ण यजुर्वेदी, हिरण्यकेशी तैतिर्य शाखा याज्ञिकीचे अध्ययन २००८ ते २०१३ या ६ वर्षांत केले. द्वितीय ते पंचम वर्षांपर्यंतचे म्हणजेच उदकशांत, उपनयन संस्कार, विवाह संस्कार इत्यादी अध्ययन केले आहे. वेदमूर्ती लक्ष्मणराव बापट यांचेकडे वेदाध्ययनाची पूर्तता केली. ही पूर्तता झाल्यानंतर ४ वर्षे चिपळूण येथे भिक्षुकीचा व्यवसाय केला. सध्या पनवेल येथे याज्ञिकी करीत आहेत. ह्यांचे वडील श्री. मुकुंदराव लोटे परशुराम येथे खाजगी कंपनीत नोकरी करतात आणि आई गृहिणी आहे. भिडे कुटुंबातील एक तरुण आधुनिक जगातील आमिषे, आप्तेष्ट, आईवडिलांना सोडून वेदपठणाचा ध्यास घेऊन हिरीरीने व जिद्दीने शिक्षण पूर्ण करतो ह्याचा आम्हा भिडे कुटुंबीयांना अभिमान आहे. ह्यासाठी राहुलचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. समस्त भिडे मंडळींचे आशीर्वाद त्याच्या पाठीशी आहेत आणि राहावेत हीच सदिच्छा.



भिडे संमेलनाला

हार्दिक शुभेच्छा

# मंगलम् ट्रेडिंग कंपनी

## जनरल मर्चन्ट ॲण्ड कमिशन एजंट

४०५, मार्केट यार्ड, सिंडिकेट बँकेसमोर, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
फोन : २४२७०९३०, २४२७०९४०, मो. ९३७१००६१९७, ९८९०२७१००५



**साखर, गहू, ज्वारी, तांदूळ, डाळी, आटा, रवा, बेसन, मैदा, कडधान्ये, साबुदाणा यांचे होलसेल व्यापारी**

**रविवारी बंद**

* सुलेखचंद जैन * संदीप जैन

## माझी आई पुरस्कार - २०२०

### श्रीमती प्रतिभा प्रभाकर भिडे, पुणे

श्री. रवींद्र रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत त्यांची आई कै. सुशीला रावजी भिडे, कल्याण यांचे स्मरणार्थ 'माझी आई पुरस्कार २०२०' पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्रीमती प्रतिभाताई ह्या पुण्यात स्थाईक आहेत. शिक्षण एम.ए., एम.फिल असून रुईया महाविद्यालय, मुंबई येथून अर्थशास्त्राच्या विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाल्या. गेली अनेक वर्षे अध्यापनाचे कार्य केले. दागिना किंवा साडीपेक्षा सुद्धा नवनवीन ज्ञान, अनुभव मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. एकेकाळी घरातील रद्दी विकून महिन्याचा शेवटचा आठवडा काढायचा अशा कठीण परिस्थितीवर मात करून जिद्दीने व गुणवत्तेच्या जोरावर आपला जीवनप्रवास यशस्वी केला. शाळेच्या शिक्षिकेपासून ते महाविद्यालयीन प्राध्यापिका होण्याचा ध्येयपूर्तीसाठी चिकाटीने स्वतः प्रयत्न करून घडविले आहे. जागतिक भारी पुरणपोळी करणारी आणि मत्स्यकार सुंदर डोळे म्हणून मीनाक्षी, तसेच भविष्यातील आविष्कारांची नांदी म्हणून लग्नानंतरची प्रतिभा असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. असे वर्णन त्यांच्या कन्या सौ. जयश्री कीर्तने आवर्जून सांगतात. वयाच्या ७० व्या दशकापासून सुमारे १० परदेश वाऱ्या केलेल्या आहेत. रुईया महाविद्यालय, मुंबई, वेलींगकर, जमनालाल बजाज संस्था तसेच पुणे विद्यापीठ ह्या शिक्षण संस्थांमधून बाहेर पडलेले, उच्च पदावर काम करणारे त्यांचे नामवंत विद्यार्थी आजही प्रतिभाताईंचे नाव आवर्जून घेतात. सुबक हस्ताक्षर व रांगोळी ही त्यांची खासियत आहे. वाचन आणि अध्यापन हे त्यांचे आवडते छंद आहेत. गेली ८ ते १० वर्षे त्या सामाजिक बांधिलकीतून भिडे प्रतिष्ठानच्या संमेलन, हळदी-कुंकू इत्यादी कार्यक्रमांमध्ये सक्रिय आहेत. मागील वर्षीच्या लेखन स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या. ह्या वर्षीच्या लेखन स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. लेखन स्पर्धेची अचूक व काटेकोर तपासणी आणि पारदर्शकता ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. वयाची ७८ वर्षे होऊन सुद्धा योगसाधना, नियमित व्यायामामध्ये कधीही खंड पडलेला नाही. अशा ह्या सदाप्रसन्न, बहुगुणी आईचा, भिड्यांच्या भगिनीचा 'माझी आई' पुरस्कारासाठी सन्मान केला जात आहे ह्यापेक्षा दुसरा आनंद काय असू शकतो ? त्यांचे आरोग्य उत्तम राहो हीच सदिच्छा !



## आपली सून पुरस्कार २०२०

### सौ. योगिता मनोज भिडे, पनवेल

सौ. मेधा तथा अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत 'आपली सून पुरस्कार २०२०' पनवेल येथील भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. सौ. योगिता पूर्वाश्रमीच्या कु. योगिता विजय वझे, गुहागर. वयाच्या २५ व्या वर्षी श्री. मनोज यांचेशी विवाह करून भिडे घराच्या स्नुषा झाल्या. सर्व काही व्यवस्थित सुरू असताना २००८ मध्ये त्यांचे सासरे डॉ. सुधाकर यांचा अल्पशा आजाराने दुर्दैवी मृत्यू झाला आणि कुटुंबावर आभाळच कोसळले. डॉ. सुधाकर आजारी असताना योगिता यांच्या पतीने सेवा, सुश्रुषेसाठी नोकरी सोडली असल्याने घर चालविण्यासाठी उदरनिर्वाहाचे साधन म्हणून जेवणाचे डबे सुरू केले. पनवेलमध्ये स्वतःची जागा असल्यामुळे पेईंगगेस्टसाठी काही जागा भाड्याने दिली. एक दिवस भाड्याने राहणाऱ्या दोघांनी चहा व पोळीभाजी मिळेल का म्हणून विचारणा केली असता आपण हाच उद्योग सुरू केला तर उत्पन्नाचे साधन म्हणून होईल असा विचार केला.



(पान १८ वर पहा)

*With Best Cpmpliments From.....*

Schneider Electric

# Satyam Enterprises

**Official Distributors of Schneider Electric**

*****

1934, Sadashiv Peth, Madiwale Colony,
**Pune - 411 030.**
**Phone :** 020-2445 1235, 2446 6139
**Website :** satyampune.com

***For***

• visiting Cards • Flyers • Brochures • Book Printing

Visit Our Site

Art & PrintShop.com

www.artandprintshop.com

**A K. C. Bhide**

Block Makers Brand

1977, Sadashiv Peth, Madiwale Colony, **Pune-411 030.,** India.
**Phone :** +919371028412, 9422303800

# ऋषितुल्य !

### श्री. अरुण महादेव भिडे, नाशिक

वय ७५ वर्षे. शिक्षण बी.कॉम., एल.एल.बी., नोकरी बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ३७ वर्षे एक्झीक्युटीव्ह म्हणून निवृत्त. निवृत्तीनंतर नाशिक पिपल्स को-ऑप. बँकेमध्ये ३ वर्षे सल्लागार म्हणून स्वेच्छेने काम केले. ग्राहक पंचायत नाशिक येथे ३ ते ४ वर्षे कार्य केले. सध्या नाशिकमधील निवृत्त बँक संघामध्ये सक्रिय आहेत. नाशिक येथील भिडे कुल संमेलनात सक्रिय कार्यकर्ते. ह्या संमेलनात हिशोबाची जबाबदारी सांभाळली.



### सौ. लता वसंत ओंकार

पूर्वाश्रमीच्या कु. स्नेहलता वामन भिडे, वय ७३ वर्षे. शिक्षण बी.ए. (ऑनर्स) (मुंबई) १९६८ ते १९७२ के.बी. कन्या विद्यालय पनवेल येथे शिक्षिका. दासबोध, गीता व ज्ञानेश्वरीच्या परीक्षा उत्तीर्ण. गीता धर्म मंडळाच्या माध्यमातून गेली १५ वर्षे 'ज्ञानेश्वरी प्रबोध' वर्गाची समीक्षक. पू. कै. पांडुरंगशास्त्री आठवले, कै. राम शेवाळकर, विदुषि मोहना चितळे व कल्याणी नामजोशी ह्यांचे मार्गदर्शन लाभले. वाचन, प्रवास, ब्रीज खेळणे व आध्यात्मिक प्रवचने ऐकणे ह्याची आवड आहे. श्रवण उत्तम झाल्याने आवड असणाऱ्यांसाठी ज्ञानेश्वरी, दासबोध, मनाचे श्लोक सोपे करून सांगण्याचा प्रयत्न सुरू आहे.



### सौ. सुनिता शरद ओक

पूर्वाश्रमीच्या कु. सुधा वामन भिडे, वय ७४ वर्षे. शिक्षण ११ वी पास. दोन ड्रॉईंगच्या, तीन हिंदीच्या परीक्षा उत्तीर्ण. हस्तकला, पेंटिंग, लॅमिनेशन, खडू तयार करणे किंवा क्राफ्टच्या सरकारमान्य सर्व परीक्षा उत्तीर्ण. मुलुंड रोटरी स्कूल ऑफ डफ ह्याठिकाणी २६ वर्षे सरकारी नोकरी, वाड्या-वस्त्यांवर किंवा रस्त्यावर फिरणाऱ्या लहान मुलांना शिकवले. निवृत्तीनंतर २ वर्षे कॅन्सर हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सेवा. सध्या पुण्यात स्थायिक असून सिप्ला सेंटरमध्ये सक्रिय रुग्ण सेवा.




### श्रीमती शैलजा हरी भिडे

वय ८२ वर्षे. शिक्षण एस.एस.सी. व एस.टी.सी. ग्रंथालय व्यवस्थापनाचे शिक्षण घेतले आहे. (लायब्ररीयन सर्टि-फिकेट कोर्स) परांजपे विद्यालय, अंधेरी येथे ग्रंथपाल म्हणून २१ वर्षे नोकरी केली. संगीत व वाचनाची आवड आहे. सध्या मुंबईत मालाड येथे वास्तव्य आहे.



### श्रीमती पुष्पा विष्णू भिडे

वय ७५ वर्षे. जन्म जामसंडे, सिंधुदुर्ग येथे. शिक्षण बी.ए. (ऑनर्स). १९६४ मध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत इंग्रजी शिकवण्याकरिता रुजू. नोकरी करताना संस्कृत विषयामध्ये बी.ए. झाल्या. स्कॉलरशिपसाठी विनामूल्य वर्ग घेत असत. २००२ मध्ये देवगड येथे स्थायिक झाल्या. ३१ वर्षे नोकरीनंतर ५ वर्षे नोकरी शिल्लक असताना घरगुती अडचणीमुळे स्वेच्छानिवृत्ती घेतली. लेखन, वक्तृत्व, भरतकाम, शिवणकाम, बागकाम ह्यांची आवड होती. लोकप्रभा साप्ताहिक, शाळेचा विशेष वार्षिक अंक ह्यात प्रथम क्रमांकाची पारितोषिके प्राप्त. स्नेहप्रभा मासिक,



स्वामिन-तव-शरणम, साप्ताहिक मलगार इत्यादी मासिकांमध्ये पारितोषिके प्राप्त. सार्वजनिक गणेशोत्सवात रांगोळीचे द्वितीय पारितोषिक. भारतात व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रवास तसेच गीता, ज्ञानेश्वरी, गीता रहस्य, मनुस्मृती इत्यादी ग्रंथवाचन केले. शेवटी त्या म्हणतात की आपल्या नशिबात जी गोष्ट नाही त्याच्यामागे धावत राहिले तर दुसऱ्या गोष्टीतही प्रगती खुंटते. म्हणून 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे' ह्याप्रमाणे पुढील वाटचाल चालू आहे.

**कुलवृत्त निवेदन**

**कुलवृत्ताची प्रत सवलतीच्या दरात देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार पूर्वीचे देणगी मूल्य रु. ८०० ऐवजी रु. ५०० इतके ठेवण्यात आलेले आहे.**

* संपर्कासाठी.....
**दिलीप भिडे** (पुणे) ९६५७५४१२३६ किंवा
**ले. क. सुनिल भिडे** (पुणे), ९६२३०१७४४४

**आपली सून पुरस्कार २०२० (पान १५ वरुन)**

परंतु स्वयंपाक कसा होईल किंवा झेपेल का अशी शंका होती. सासूबाई आणि यजमान खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. घरातील सर्वांच्या मदतीने ह्या उद्योगाची वृद्धी होऊ लागली. माझे माहेर गुहागर असल्याने आणि पनवेलमध्ये हा व्यवसाय असल्यामुळे फारसे जाणे-येणे नसले तरी माहेर व सासर ह्या दोन्ही घरांना मी जोडलेले असल्याने कुठे अडचण झाली नाही. सासूबाई अंजली भिडे ह्या आवर्जून सांगतात की सुनेने जिद्द, चिकाटी व कष्ट केल्यामुळेच आमचे घर उभे आहे. सौ. योगिता ह्यांना एक कन्या असून तिच्या शिक्षणासाठी कोठेही कमी पडू देत नाहीत. पनवेलच्या संमेलनासाठी त्या स्वतः आणि घरातील सर्वच मंडळी खूप सक्रिय आहेत. सामाजिक कार्य, वाचनाची पण आवड आहे. अशा ह्या चिकाटी असलेल्या आणि कष्टाळू सुनेचे कौतुक करावे तेवढे तोकडे आहे. तिला भरपूर यश मिळो ह्यासाठी भिडे ज्ञातीचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहेत व राहतील हीच सदिच्छा !

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

**Bhide & Associates**

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931
7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027
7776027779

**अभिनंदन**

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे सर्वांसाठी लेखन स्पर्धा घेण्याचे हे दुसरे वर्ष आहे. भिडे कुलोत्पन्नाला लिहिते करण्यासाठी प्रोत्साहन हा त्यामागे हेतू आहे. आपण काही वेळा उत्तम बोलतो. परंतु ते चांगल्या तऱ्हेने लिहिणे हे अवघड काम असते. म्हणून हा प्रयत्न केला आहे. ह्यावर्षी उदंड प्रतिसाद मिळाला. एकूण २१ लेख स्पर्धेसाठी आले. भिडे प्रतिष्ठानतर्फे सहभागी भिडे मंडळींना सर्वप्रथम धन्यवाद देतो. शब्दमर्यादेसहित ८ विषय दिलेले होते. त्यानुसार एकूण ५ पारितोषिके आणि उत्तेजनार्थ २ अशी २०२० जानेवारीमध्ये होणाऱ्या भिडे संमेलनात प्रदान करण्यात येत आहेत. लेखन स्पर्धेतील आलेल्या सर्व लेखांना आपण 'आम्ही भिडे' अंकामध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार फोटोसह प्रसिद्धी देणार आहोत. पुन्हा एकदा सर्व स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन ! ह्या स्पर्धेचे **परीक्षक म्हणून श्रीमती प्रतिभाताई भिडे, पुणे** (एम.ए., एम.फिल.) ह्यांनी उत्कृष्टपणे काम केले आहे आणि त्यानी निवड केलेल्या क्रमांकाचे स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे..... **※ प्रथम क्रमांक - सौ. तन्मयी संजय भिडे, गोवा** (पहिलं-वहिलं) **※ द्वितीय क्रमांक - श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर** (पहिलं-वहिलं) **※ तृतीय क्रमांक - सौ. सीमा सुभाष भिडे, डोंबिवली** (पर्यावरण) **※ उत्तेजनार्थ** - सौ. अरुणा अरुण भिडे, नाशिक (माझं माहेर) **※ उत्तेजनार्थ** - सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे (माझं माहेर)

**- दिलीप भिडे,** विश्वस्त/सचिव

**लेखन स्पर्धा २०२०**
**प्रथम क्रमांक**

# सोनचाफा

**- सौ. तन्मयी संजय भिडे (घाणेकर),**
रायबंदर, गोवा. मो. +९१ ९४०४२३१३२०

साजिरं-गोजिरं मनाच्या कुपीत अलगद जपलेलं, हृदयाच्या अगदी जवळचं, पहिलं-वहिलं... माझं गाणं... मी लिहिलेलं आणि संगीतबद्ध केलेलं... सोनचाफा... आज जवळपास पाच वर्षांनंतरही त्याचा दरवळ माझ्यासाठी तितकाच ताजा, सुंदर, सुखावणारा आहे. गाण्याची निर्मिती म्हणजे जणू आईने बाळाला जन्म देणंच. तितकंच सुखद, आल्हाददायक. त्यातूनही पहिल्या मुलाचं कोडकौतुक नाही म्हटलं तरी काकणभर जास्तच होतं. म्हणूनच की काय, अमूर्ताकडून मूर्ताकडे झालेल्या माझ्या सोनचाफ्याचा प्रवास आजही माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा आहे.



लहानपणापासूनच मला गाण्याची अगदी मनापासून आवड. पहिलं प्रेमच म्हणा ना! ती आवड जोपासत मी किशोरवयात प्रवेश केला आणि माझ्यातल्या संगीतकाराने जन्म घेतला. ती कविता लिहिली होती माझी मोठी बहीण ऋचा घाणेकर-थत्ते हिने. त्या कवितेला मी प्रांजळपणे साधीसुधी चाल लावली. त्यानंतर बाबांच्या कवितांना हात घातला आणि हळूहळू विविध रंगरूपांची काव्यफुलं वेचून संगीतमालेत गुंफण्याची मला गोडीच लागली. बघता बघता असे आठ-दहा गजरे गुंफून झाले. पण तोपर्यंत मी लेखणी हातात घेतली नव्हती. कुठूनशा झरोक्यातून हलकेच एक इवलीशी मंद झुळुक येते आणि एक टवटवी देऊन जाते तसं काहीसं एक दिवस झालं. सहज बसले होते आणि अचानक काहीतरी सुचलं म्हणून जवळच्याच चिटोऱ्यावर दोन ओळी खरडल्या.

सोनचाफा अंगणात बहरला पारिजात, रुपेरी चांदण्यांची हृदयात बरसात !
धुंदावले मन हे खुळावले मन, हे पावरीची धून सखी नादावले मन हे !!

माझ्या सोनचाफ्याचा प्रवास आजही माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा आहे.

लहानपणापासूनच मला गाण्याची अगदी मनापासून आवड. पहिलं प्रेमच म्हणा ना! ती आवड जोपासत मी किशोरवयात प्रवेश केला आणि माझ्यातल्या संगीतकाराने जन्म घेतला. ती कविता लिहिली होती माझी मोठी बहीण ऋचा घाणेकर-थत्ते हिने. त्या कवितेला मी प्रांजळपणे साधीसुधी चाल लावली. त्यानंतर बाबांच्या कवितांना हात घातला आणि हळूहळू विविध रंगरूपांची काव्यफुलं वेचून संगीतमालेत गुंफण्याची मला गोडीच लागली. बघता बघता असे आठ-दहा गजरे गुंफून झाले. पण तोपर्यंत मी लेखणी हातात घेतली नव्हती. कुठूनशा झरोक्यातून हलकेच एक इवलीशी मंद झुळुक येते आणि एक टवटवी देऊन जाते तसं काहीसं एक दिवस झालं. सहज बसले होते आणि अचानक काहीतरी सुचलं म्हणून जवळच्याच चिटोऱ्यावर दोन ओळी खरडल्या.

सोनचाफा अंगणात बहरला पारिजात, रुपेरी चांदण्यांची ह्रदयात बरसात !
धुंदावले मन हे खुळावले मन, हे पावरीची धून सखी नादावले मन हे !!

आणि काहीच वेळात माझं पहिलं काव्य लिहून पूर्ण झालं. ते वाचत असतानाच धून सुचली आणि कवितेचं गाणं झालं. ह्या गाण्याचा पुढचा प्रवास होता तो ते गाणं लोकांपर्यंत पोहोचवण्याचा. दोन वर्षं ते गाणं तसंच राहिलं. कागदावर आणि माझ्या मनात. मग अनिकेत दामलेंच्या रूपाने एक हुशार संगीत संयोजक व चांगला मित्र भेटला. त्याने सुंदररित्या ते गाणं सजवलं. माझ्याबरोबर ऋचा बोंद्रे या खूप छान गायिकेने ते गायलं आणि मोहीत शास्त्रींच्या बासरीने कान्ह्याच्या मुरलीची झलक दाखवून दिली आणि माझं हे पहिलं तान्हुलं कान्हुलं जन्माला आलं. आई-बाबांच्या, बहिणींच्या व जवळच्या व्यक्तींच्या पाठिंब्याने एक स्वप्न साकार झालं... माझं गाणं... पहिलं-वहिलं !

---

**लेखन स्पर्धा २०२०**
**द्वितीय क्रमांक**

# रामप्यारी

**- श्री. राजेंद्र महादेव भिडे,**
मुंबई. मो. ९९२०९६९३२८

लहानपणी मला स्कूटरवर मागे बसायला खूप आवडत असे. त्यामुळे मोठं झाल्यावर स्कूटर घ्यायची अशी इच्छा मनात धरून, एकोणिसाव्या वर्षी भारतीय वायूसेनेच्या सेवेत रुजू झालो. सुरुवातीची पाच-सात वर्षे दुर्गम प्रदेशात गेली आणि मग माझी पोस्टींग जोधपूरला झाली. त्यात माझं लग्न ठरलं. तेव्हा माझ्या अर्धांगिनीच्या आधी माझ्या आयुष्यात आली ती माझी स्कूटर. एलएमएल व्हेस्पा माझी रामप्यारी.



बायकोला जोधपूरला घेऊन आलो. नवीन संसार सुरू झाला आणि पहिली ओळख करून दिली ती माझ्या रामप्यारीशी. मग काय, रोज नवीन संध्याकाळ, रोज नवीन ठिकाण. आम्ही दोघं आणि माझी रामप्यारी. गुलाबी थंडीत जोधपूरचा किल्ला, पावसात उमेदभवन, गुलाबजाम रतनाडाचा, लस्सी घंटाघरची आणि खूप काही. रामप्यारी मला सांभाळून फिरवत होती. एकदा आम्ही मित्र दुचाक्या घेऊन आपापल्या पत्नीसमवेत साधारण ७० किमी. दूर प्रेक्षणीय स्थळी गेलो. रस्ता थोडा नावडताच होता. काय झालं कळलं नाही. पण सर्व दुचाक्या अधेमधे बंद पडल्या. पण माझी रामप्यारी नाही. आहे की नाही गंमत ? चार वर्षांनी माझी पोस्टींग दिल्लीला झाली. आता रामप्यारीला आम्हा तिघांची काळजी घ्यायची होती. तिची जबाबदारी वाढली होती. दिल्लीच्या दाटीवाटीच्या रहदारीत तिला माझ्यासाठी रस्ता शोधायचा होता. एकदा तर

लोटस टेम्पलच्या गर्दीत माझ्या अडीच वर्षांच्या बाळाने हात सोडला आणि नाहीसा झाला. दिल्लीच्या थंडीत मला घाम फुटला. प्रयत्न आणि धीर दोन्ही खचले. शेवटी पोलिसांकडे धाव घ्यायची म्हणून रामप्यारीकडे आलो. पाहतो तर काय आमचं हरवलेलं बाळ तिथेच बसलं होतं. जणू रामप्यारी मला सांगत होती, अरे का घाबरतोस, मै हूँ ना ! नोकरी संपताना शेवटची दोन वर्षे मी मुंबईला पोस्टींग आलो. दुर्दैवाने माझे वडील आजारी पडले. इस्पितळाच्या अनेक फेऱ्या झाल्या पण माझ्या रामप्यारीने मला धीर दिला. तिच्यावर माझा पूर्ण विश्वास होता. मी तिला कधी निर्जीव वस्तू मानलंच नाही. आमच्यामध्ये नातंच तसं होतं आणि संवाद म्हणजे अगदी शब्देविण संवादू म्हणतात ना तसं. माझ्या सुखदुःखात सहभागी माझ्या रामप्यारीनं मला खूप सांभाळलं. प्रसंगी तिला खरचटलं पण मला तिने पडू दिलं नाही. पंधरा वर्षं माझ्या कुटुंबासह अनेक फोटोंमध्ये वाकून बघणाऱ्या माझ्या रामप्यारीचा वेग आता मंदावला होता. तिच्या डोळ्यातील चमक आता कमी होत होती, अवयव बोलू लागले होते. जणू ती मला समजावत होती की, आता आपल्या वियोगाची वेळ आली आहे. शेवटी मी तिच्यापासून दूर होण्याचा निर्णय घेतला. तिला हातगाडीवरून जाताना बघून माझे डोळे पाणावले होते, पण ती मला माझ्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत होती.

---

**लेखन स्पर्धा २०२०**

**तृतीयक्रमांक**

# पर्यावरण

**- सौ. सीमा सुभाष भिडे,**
डोंबिवली, ९८३३४२४२१७



विषय वाचला आणि मला माझा छोटासा छंद लिहावासा वाटला. ४४ वर्षांपूर्वी माझे लग्न झाले. मी ठाण्याहून डोंबिवलीला राहायला आले. रोज डोंबिवली-ठाणे-डोंबिवली असा ऑफिस ते घर असा रेल्वे प्रवास सुरू झाला. दिवा-कळवा दरम्यानची दिसणारी सुरेख खाडी घरातून निघताना व ऑफिसमधून दमलेल्या माझ्या मनाला आलेल्या मरगळीला खाडीतील बेटे आणि खाडीचे स्वच्छ नितळ पाणी पाहून कुठल्याकुठे पळवून लावी. मन उल्हासित होई. पण हल्ली हाच प्रवास करताना मात्र मन खट्टू होते. कारण खराब झालेले खाडीचे पाणी, ओहोटी असेल तर सगळा पिवळा चिखल, त्यात तरंगणाऱ्या, झाडांवर अडकलेल्या प्लास्टीकच्या पातळ पिशव्या पाहिल्या की अगदी वैताग येतो.

मला सुरुवातीपासून शिवणकामाची फार हौस होती. मुलं छोटी असताना मी नोकरी सोडून घरी बसले. मग शिवणासाठी मला भरपूर वेळ मिळू लागला. कपडे शिवून झाले की उरलेल्या कापडामध्ये तेव्हा नवीन पद्धतीच्या भाजीच्या पिशव्या बाजारात आल्या होत्या. त्या शिवण्याचा मला छंद लागला. माझ्या वेगवेगळ्या रंगीबेरंगी भाजीच्या पिशव्यांकडे सहजच सगळ्यांचं लक्ष जायचं. त्या काळात भाजी, वाण सामानासाठी कापडी पिशव्याच वापरण्याची पद्धत होती. कुठेही प्लास्टीकच्या पातळ पिशव्या मिळायच्या नाहीत. फक्त कपड्यांच्या दुकानात जाड प्लास्टीकच्या पिशव्या मिळायच्या. कोणी पाहुणे आले, हळदीकुंकू, श्रावण महिना अशा वेळी आलेल्या पाहुण्याबाईंना हळदीकुंकू लावून एक कापडी पिशवी हातात ठेवायची, असा शिरस्ता मी सुरू केला. अशा दिलेल्या पिशव्या त्यांना आवडू लागल्या. पिशवीची छोटीशी घडी करून पर्समधे छान राहते. घरी व्यवस्थित शिवली असल्यामुळे टिकायलाही दणकट असते. त्यात सामानही भरपूर मावते. त्यामुळे त्या भगिनींच्या पसंतीलाही उतरू लागल्या. त्यामुळे देण्याघेण्यासाठी त्या पिशव्या शिवून घ्यायल्या लागल्या. अशी माझ्या भाजीच्या पिशव्यांची खूप

तोंडी प्रसिद्धी होऊ लागली. त्यातून छोटासा व्यवसाय केल्याचा आनंदही मिळाला.

२५-२६ वर्षांपासून प्लास्टीकच्या पातळ पिशव्या भाजीसाठी, वाण्याकडे मिळायला सुरुवात झाली. त्या पिशव्या एकदा वापरल्या की फाटत असत. त्यामुळे खूप घाण होऊ लागली. ह्या प्लास्टीक पिशव्या मातीत विरघळत नसल्यामुळे प्रदूषण खूपच वाढू लागले. तसेच खूप पाऊस पडला की किंवा गटारीत ह्या प्लास्टीक पिशव्या अडकून गटारी तुंबतात. पाणी सगळीकडे साचून राहते. ह्या होणाऱ्या प्रदूषणाला आवरायला हवे हे समजत होते. पण आपण स्वतः मोठ्या प्रमाणात उपाय करू शकत नव्हते. पण छोट्या प्रमाणात तरी आपण उपाय करायचा असे ठरवले. म्हणून दरवर्षी ५०० कापडी पिशव्या शिवून फुकट वाटायच्या असे ठरविले. त्याप्रमाणे गेली २५ वर्षे वेगवेगळ्या ठिकाणी वाटल्या. मी १० हजारच्या वर पिशव्या फुकट वाटल्या व १५-२० हजार पिशव्या अतिशय माफक किंमतीत विकल्या. खूप काही प्रदूषणासाठी करू शकले नाही तरी माझ्यासारखी सर्वसाधारण गृहिणी संसार, मुलं सांभाळून एकूण २५-३० हजार पिशव्या शिवून विकत-फुकट वाटू शकली हे नक्कीच कौतुकास्पद काम आहे असे मला वाटते. आज मी राहते त्या भागात माझ्या पिशव्या खूप प्रसिद्ध आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर माझ्या एका मैत्रिणीने माझ्याकडून १० पिशव्या घेतल्या. दिवाळीत भेटलेल्या भावा-बहिणींना त्यातून खाऊ-भेटी घालून दिल्या. त्यातून स्फूर्ती घेऊन त्यांच्या भावाने १०० पिशव्या शिवून घेतल्या. संक्रांतीला त्यांच्या बायकोचे हळदीकुंकू म्हणून भाजीवाल्याकडे दिल्या. भाजीला आलेल्या ज्यांनी प्लास्टीक पिशवी मागीतली त्यांना त्या वाटल्या. अशी अनेक उदाहरणे झाली. आता मागे वळून बघताना सुरुवातीला हौस म्हणून सुरुवात केलेल्या छंदाने मला व्यवसाय केल्याचा आनंदही दिला आणि अचानकपणे समाजाच्या थोडासा का होईना उपयोगाला आलो. प्रदूषणाला आळा घालायला थोडासा का होईना खारीचा वाटा आपण उचलू शकलो याचा मला स्वतःला आनंद वाटतो तसेच कृतकृत्यही वाटते.

---

**लेखन स्पर्धा २०२०**

**उत्तेजनार्थ**

# परीक्षा

**- सौ. अरुणा भिडे,**
नाशिक. ०२४८-२३१४२२१



प्राजक्तमध्ये सदर विषयाबाबतची सूचना वाचली आणि डोळ्यांपुढे आली आमचा मुलगा चि. उमेश अरुण भिडे याची इ. १०वी ची परीक्षा. उमेश इ. १ लीच्या सहामाही परीक्षेत १ ला आला आणि तिथूनच आम्हाला आणि त्यालाही त्याच्या पहिल्या नंबरची सवय झाली होती. बघता बघता तो मोठा झाला आणि जवळजवळ प्रत्येक वर्षी शाळेच्या सर्व तुकड्यांमध्ये दरवर्षी पहिला येत १० वीत गेला. शाळेच्याही स्पेशल गुणवत्ता वर्गासाठी निवड झाली त्याची. त्याच्या ८ वी व ९ वीमध्ये मीही माझी पदव्युत्तर शिक्षणाची हौस भागवून घेतली होती आणि एम.ए. मानसशास्त्र ही पदवी प्रथम वर्गात मिळवली होती. हेतू एकच की आता १० वीच्या वर्षासाठी, अभ्यासासाठी मी स्वतः वेळ देऊ शकेन. उमेशची १० वी सुरू झाली आणि मला ज्ञानप्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस विभागात यूजीसी च्या संशोधन सहाय्यक पदासाठी मुलाखतीला बोलावले गेले. मी ठरवले होते की उमेशचे महत्त्वाचे वर्ष आहे, त्याच्या शाळेचीही अपेक्षा होती की त्याने गुणवत्ता यादीत चमकावे, तर मी स्वतःचे काही काम न ठेवता पूर्ण वेळ घरासाठी, मुलांसाठी वेळ द्यावा. उमेशचे खाणेपिणे व शाळा, क्लासेसचे वेळापत्रक जे खूपच भरगच्च होते, ते व्यवस्थित सांभाळावे. तेवढ्यात हे बोलावणे आले आणि सर्वानुमते मी

मुलाखतीसाठी जावे असे ठरले आणि चक्क माझी निवडीही झाली त्या पदासाठी. मोठा प्रश्न पडला की आता काय करावे ? मी दिवसभर बाहेर असणार. मग मुलांच्या खाण्यापिण्याच्या वेळा कोण सांभाळेल ? मी केलेल्या वेळेच्या तडजोडीमुळे उमेशच्या गुणवत्ता यादीत येण्यावर काही परिणाम तर होणार नाही ना ? घेऊ का मी ही संधी ? आनंदाची बाब म्हणजे अरुण यांचे मला पूर्ण सहकार्य होते. तसे माझ्या एम.ए.च्या दोन वर्षांत मुलांना व घरात त्यांनाही मी बाहेर व बिझी असण्याची सवय झाली होती. पण तरीही मन द्विधा होत होते. मग मी ठरवले की आपण प्रज्ञा मानस संशोधिका प्रमुख डॉ. उषाताई खिरे यांना भेटून त्यांचा सल्ला घ्यावा. त्या म्हणाल्या, "अगं मुलांना आपली आई कार्यरत असणे आवडते. त्यांना तुझे सतत घरात नसणे देखील सवयीचे झाले आहे. आणि तू त्याचा अभ्यास घेतेस का ?" मी - "नाही, अभ्यास तर मुले पहिलीपासून आपापला करतात. काही अडले तर मी पाहते." उषाताई - "मग झाले तर, तू ही संधी सोडू नको. लगेच रुजू हो. उमेशच्या परीक्षेच्या वेळी मी तुला सोईच्या वेळा देईन." आणि घरी येऊन सांगितले की मी काम सुरू करते आहे. चक्क माझा मुलगा उमेश म्हणाला, "आई तू खरेच ही संधी सोडू नको. कारण जेव्हा मी बोर्डात येईन तेव्हा माझ्या मुलाखतीत मला हे सांगायला खूप छान वाटेल की माझी आई मानसतज्ज्ञ म्हणून काम करते." झाले, सारा प्रश्नच मिटला. आनंदाची बाब म्हणजे वर्षभर नियमित अभ्यास व क्लासेस करून उमेश त्यावर्षी एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत पुणे विभागात १४ वा आला. मला हा अनुभव एक मानसज्ञ म्हणून पालकांसाठी अधिक सांगावासा वाटला. कारण आपण २४ तास मुलांना दिले पाहिजेत अशी गरज नसते, तर जो वेळ आपला मुलांबरोबर घालवतो तो गुणवत्तापूर्ण असावा. मग दिवसातून एखादा तास मिळाला तरी ते पुरेसे आहे. अर्थात, त्याच्या बाबांचेही उमेशच्या गुणवत्ता यादीत येण्यामागे सहकार्य होतेच. उमेश शाळा, क्लासेसला जाणे-येणे पूर्णपणे सायकलवरून करत असे. पण परीक्षेआधी त्याने सोडवलेले बरेच पेपर्स वेगवेगळ्या शिक्षकांकडे नेऊन देणे, तपासून झाल्यावर घेऊन येणे, वेगवेगळे शाळांचे प्रिलीम परीक्षांचे पेपर्स मिळवणे अशा कामात त्यांची मदत असे. एकंदर घरातील वातावरण सौहार्दपूर्ण राखणे, मुलांच्या आरोग्यासाठी त्यांचा आहार, व्यायाम, नियमितपणा इकडे लक्ष देणे ही पालकांची जबाबदारी असते. आणि त्यानंतर मुलांनी मिळवलेल्या उज्ज्वल यशाची अनोखी आनंदमय भेट सर्व मित्रमंडळी व नातेवाईक यांच्यासह साजरी करणे यासारखे दुसरे सुख कोणते ?

---

**लेखन स्पर्धा २०२०**

**उत्तेजनार्थ**

# माझं माहेर

**- सौ. वर्षा दिलीप भिडे,**
पुणे. ९७६३०७९१३१



माहेर म्हणजे स्त्रियांच्या मर्मबंधातली ठेव असते. कारण ते घर आई-बाबांचं, भावा-बहिणींचं आणि माझे माहेर आपले असते. तिथे प्रेम, आपुलकी व माया असा त्रिवेणी संगम असतो. माझं माहेर पाटणकर आणि सुसंस्कृत, आपुलकी, शिस्तीचे आणि नाती जपणारं असं आहे. आयुष्याचे पहिले धडे तिथेच रंगविले.

घरामध्ये माझी आई थोडीशी मवाळ पण उत्तम संस्कारांची आणि वडील कडक शिस्तीचे आणि संस्कारांचे असल्यामुळेच मी घडले. १९८५ साली लग्न झाल्यावर मी भिड्यांच्या घरात आले आणि माहेरी मिळालेली संस्कारांची शिदोरी जवळ होतीच. शिस्त व संस्कार ह्यांचे एक उदाहरण म्हणजे माझ्या वडिलांचे २००२ साली अचानक निधन झाले. सर्वसाधारणपणे आवडत्या व्यक्तीचे निधन झाल्यावर त्यांची एक आठवण म्हणून एखादी वस्तू त्याज्य करण्याचा प्रघात आहे.




**प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय :** टीजेएसबी हाऊस, प्लॉट क्र. बी-5, रोड क्र. 2, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे ( पश्चिम ) - 400 604

वडिलांचे दिवस पूर्ण झाल्यावर नातेवाईकांपैकी एकाने माझ्या भावाला एक प्रश्न विचारला की तू त्यांना आवडती असलेली कोणती वस्तू त्याज्य करणार ? त्यावर भावाने उत्तर दिले की त्यांना शिस्त आवडायची त्यामुळे काय सोडू हाच प्रश्न आहे. म्हणजे इतक्या संस्कारी आणि शिस्त असलेल्या कुटुंबात मी जन्माला आले हे मी माझे भाग्य समजते. इयत्ता १० वी पास झाल्यावर मला आईने पोळ्या, भात, आमटी इत्यादी गोष्टी शिकवल्या त्यावेळेस कधी कधी राग यायचा, कंटाळा यायचा. परंतु लग्न झाल्यावर मुलगी कितीही मोठ्या हुद्द्यावर काम करत असली तरी तिला स्वयंपाक करता आला पाहिजे ही शिस्त होती. आम्ही घरामध्ये तीन भावंडे. परंतु वाजवीपेक्षा लाड कधीच कोणाचे झाले नाहीत. लहान, मोठा हा भेदभाव न होता जे करायचे ते सर्वांना सारखेच असायचे.

वाजवीपेक्षा जास्त खर्च न करता पैशाचे नियोजन घरामध्ये कसे करता येते ह्यासाठी मला माहेरचे संस्कार कामी आले. आणि असे नियोजन करणे घरच्या गृहिणीला सहजपणे शक्य असते. ते असे की, घराचा टॅक्स दरवर्षी एकरकमी भरताना किंवा मुलांची शाळा-कॉलेजची वार्षिक फी भरताना सर्वसामान्य घरात अवघड जाते. परंतु दरमहा ठरावीक रकमेचे रिकरींग खाते सुरू केल्यास रिकरींग सक्तीने भरले जाते, ह्या शिवाय त्यावर व्याजही मिळते आणि रिकरींग संपताना एकरकमी पैसे आल्यामुळे त्याच मिळालेल्या एकरकमी रकमेची मिळवणी सहजगत्या होऊ शकते हीच गोष्ट मी अंमलात आणल्यामुळे कधी प्रश्न उरला नाही.

मुलं लहान असताना त्यांना आपण हौसेने अनेक खेळणी, कपडे, चपला-बुटांचे जोड आवश्यकता नसताना सुद्धा घेतो परंतु थोड्याच दिवसात त्या वापरून चांगल्या असलेल्या गोष्टी तोकड्या होतात अथवा मुलांना आवडेनाशा होतात. म्हणून मुलांची हौस करावी परंतु ती सुद्धा माफकच असायला हवी. तसेच आपल्या घरातील आर्थिक योग्यतेची जाणीव मुलांना करून द्यायला हवी.

आमच्या आईबाबांनी घरामध्ये स्वतःचे ताट जेवण झाल्यावर उचलून ठेवायचे किंवा स्वतःचे कपडे स्वतः धुवायचे ही अशी स्वावलंबनाची सवय लावल्यामुळे कधी विसंबून राहावे लागले नाही. लहानपणी आई, वडील अशी कडक शिस्त लावताना मला राग यायचा, कंटाळा यायचा परंतु त्यांनी केलेल्या अशा माहेरच्या संस्कारांमुळेच कधीही कोणत्याही परिस्थितीत विचलित न होता संसाराच्या सारीपाटावर यशस्वी झाले.

## पूरग्रस्त मदत

**सांगली येथील गांवभाग परिसरातील माहेरवाशीण सौ. रमा माधव नरगुंदे ह्यांचे घराचे नुकत्याच आलेल्या पूर आपत्तीमुळे आर्थिक नुकसान झाले. त्यासाठी भिडे प्रतिष्ठानकडून रु. १०,००० ची आर्थिक मदत त्यांना देण्यात आली.**

भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !

With Best Compliments From -

**Dattaprasad Anant Bhide**
**Mutual Fund Distributor**

Mobile:+91 9881 107264
dattaprasad2811@rediffmail.com

S.No. 678, Plot No.6, Sant Eknath Co-operative Housing Society No. 2, 'Vishwajeet' Bunglow, Bibvewadi, Pune - 411 037

# भिडे नाडण कुल संमेलन २०१९



दि. १, २ व ३ नोव्हेंबर २०१९ रोजी सरसोली धाम, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे परंपरागत उत्साहात संपन्न झाले. काशिनाथ बल्लाळ भिडे यांचेपासून मोंड, ता. देवगड, जिल्हा रत्नागिरी आताचा सिंधुदुर्ग येथी भिड्यांची एक शाखा नाडण ता. देवगड येथे स्थायिक झाली. काशिनाथ यांच्या पुढच्या पिढीतील रामचंद्र काशिनाथ भिडे यांचेपर्यंत एकाच मुलाची वंशवृद्धी होत असे. मात्र रामचंद्र यांना सात मुलगे व पाच मुली असा वंश विस्तार लाभला. या बारा भावंडांचा आता पुढे तीन पिढ्यांचा विस्तार आहे. अशा या 'भिडे नाडण कुळाचे' वार्षिक संमेलन गेली अनेक वर्षे वेगवेगळ्या ठिकाणी संपन्न होत असते.

गतवर्षीच्या औरंगाबाद संमेलनाच्या आठवणी ताज्या असतानाच यंदाचे संमेलन भिड्यांची माहेरवाशीण विद्या यशवंतराव भिडे उपाख्य आरती संजय कार्लेकर, त्यांचा मुलगा डॉ. मंगेश, सुनबाई सौ. अपर्णा व एक वर्षाची नात चि. युक्ता यांच्या समर्थ आयोजनात संपन्न झाले. कोकणचे निसर्ग सान्निध्य, उकडीचे मोदक, दूध शेवया, फणसाची भाजी, सोलकढी वगैरे या भूमीतल्या विशेष पदार्थांची रेलचेल, तरुणांची अधिक उपस्थिती आणि सुंदर संस्कारित परिसर अशी या संमेलनाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. टी.व्ही. व मोबाईल हद्दपार असल्याने तीन दिवस खरेखुरे गोकुळ नांदत होते व सर्व अबाल वृद्ध परस्परांशी नव्याने एकासूत्रात बांधले गेले. स्पर्धा, वैयक्तिक व सामुहिक खेळ, बक्षिसांचा वर्षाव, सिंधुरत्न चि. सुधांशु सोमण, मिटबाव यांचे सुश्राव्य गायन व स्थानिक कलाकार श्री. गंगावणे यांची चित्रकथी व कळसुत्री बाहुल्यांचे सादरीकरण या सर्वांनी यावर कळस चढवला. चारच दिवस आधी धडकून गेलेले क्यार वादळ आणि पुढील नव्या वादळांचे इशारे अशा वातावरणात हे संमेलन मात्र ठरल्याप्रमाणे यशस्वी करण्याचे श्रेय सर्व सहभागींना जाते. खासकरून जोशी, ढापरे, कोल्हटकर, भट आदी जावई व नातजावई मंडळींचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. इथून पुढे संमेलन एक वर्ष आड करण्याचे सर्वानुमते ठरून २०२१ चे संमेलन पुणे अथवा नजिकच्या परिसरात घेण्याचा संकल्प समारोप प्रसंगी जाहीर करण्यात आला.

**ॲड. विनोद य. भिडे,** औरंगाबाद


# निसर्ग आणि आपण

– **प्रभाकर शं. भिडे,** डोंबिवली.
९८९२५६३१५४

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. माणसाला त्याच्या भोवती व्यापून राहिलेल्या सृष्टीमध्ये घडणाऱ्या अनेक गोष्टी पाहून त्यांचे कुतुहूल जागृत होई. जसजशी या गोष्टींबद्दल त्याची उत्सुकता वाढू लागली त्यातील गूढ रम्यता त्याच्या लक्षात आली तसे त्याला आश्चर्य वाटू लागले. कारण त्या गोष्टींची ताकद अफाट होती (मग ते पर्जन्य असो की अफाट महासागर असो.)

मग या घटना अशाच पद्धतीने का घडतात ? या गोष्टी आपल्याला कळल्या तर त्याचा उपयोग समस्त मानवासाठी करता येईल का ? याचा विचार तो करू लागला. हे कोडे उलगडावे, त्याचे रहस्य जाणावे म्हणून तो प्रयत्न करू लागला. त्याच्या भोवतालची सृष्टी, सृष्टीचा एक धर्म, आणि या सर्व गोष्टी घडविणारा नियंता किंवा सृष्टीकर्ता याचा ओघ आपल्या कल्याणाकरिता सुरक्षितपणे वापरता कसा येईल याचा सतत विचार करताना तो त्या गोष्टीशी लीनपणे वागू लागला. पण या एवढ्या शक्तीशी सलगी करणे शक्य नव्हते. त्यातील रहस्य जाणून घेणे आणखी अवघड होते. त्यातील मुख्य अडचण म्हणजे त्या गोष्टींना निश्चित असा आकार नव्हता. तसेच रूपही नव्हते. मग अशा गोष्टीशी सलगी, भक्ती कशी करणार ? मग त्यातून त्याला सगूण रूप द्यायचे अशी कल्पना सुचली. त्याला आकार दिला. त्यातून परमेश्वर ही संकल्पना जन्माला आली असावी. या गोष्टी घडल्या कारण या सृष्टीमध्ये मानव ही एक अशी प्रजाती आहे की देवाने त्याला सुंदर शरीर दिले. तसे या सुंदर शक्तीबरोबर विचार करणारे चांगले वाईट ओळखणारे मन व बुद्धी दिले आहे. इतर प्राणिमात्रांना मात्र देवाने मन व अंतःकरण दिले नाही. त्यामुळे ते माणसासारखे विचार करू शकत नाहीत. या देणगीमुळेच मनुष्य सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठ समजला जातो.

पण गमतीची गोष्ट म्हणजे आपण आपले शरीर पाहू शकतो पण मन मात्र कुणालाच दिसत नाही. असे



असूनही शरीरावर मनाची सत्ता असते. मन सांगेल तसे शरीर वागते. ते मनाचे दास होऊन राहते. मनामधील इच्छा, आकांक्षा, विचार शरीर बरोबर पाळते. मग माणसाने या सृष्टीमधील शक्तींचा म्हणजे पंचमहाभूतांचा विचार करता करता तो त्या शक्तींचे गायन करू लागला. त्यावर ऋचा, श्लोक, ओव्या रचू लागला. त्याच्या प्रतिभाशक्तीने किंवा असाधारण सृजनशीलतेने त्यांनी पहिला वेद रचला, लिहिला. त्याला ऋग्वेद असे नाव दिले. त्यामध्ये ५६ ऋषींनी ऋचा रचलेल्या आहेत. ते वेगवेगळ्या सुक्तांमध्ये आहेत. त्यामध्ये वरुणसूक्त आहे, पर्जन्यसूक्त आहे. तो काळ या वेदवाङ्मयाच्या रामायण महाभारताच्या कथा वाचण्यामुळे मन प्रसन्न व सतशील होते. साहजिकच निर्मळ व सत्‌शील मनामुळे माणूस इतरांबद्दल चांगला विचार करू लागतो. वेदकाळ साधारण इ.स. पूर्वी चार हजार वर्षांचा असावा असे विचारवंत, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे. म्हणजे त्याला ६ हजार वर्षे झाली. त्यानंतर वेगवेगळ्या विषयांवर व सृष्टीतील घटना, वस्तू व त्याच्या परिणामांवर अथर्ववेद, सामवेद, यजुर्वेद असे वेद लिहिले गेले. त्यातून माणसाच्या आरोग्याची काळजी घेणारा आयुर्वेद हा या वेदांचा एक भाग आहे हे सर्व त्यावेळच्या ऋषी-मुनींना किंवा राजेमहाराजांना अगाध दृष्टिकोनातून सुचले असावे. याचे उत्तम

उदाहरण म्हणजे पतंजली ऋषींची लिहिलेली योग साधना. त्यातून पुढे वेदाचे सार, सूक्त अशी 'उपनिषदे' निर्माण झाली. भारत स्वतंत्र झाल्यावर भारताचे बोधवाक्य 'सत्यमेव जयते' हे एका उपनिषदामधून घेतले गेले आहे. उपनिषदात अनेक प्रार्थना आहेत. त्या अर्थपूर्ण व शांतरस निर्माण करणाऱ्या आहेत. आपल्या उपनिषदातील शांत रसाने परिपूर्ण अशा अनेक प्रार्थना आहेत. त्यातील व्याकुळता व भक्तिभाव मनाचे मालिन्य दूर करतो. मनःशुद्धीचा हा आनंद झोपतेवेळी असेल तर आपल्या मनावरील नकारात्मक भावना (मालीन्य) दूर करतो. अशा शांत अवस्थेमध्ये झोप हे फार मोठे सुख आहे. विनोबा भावे यांनी झोपेचे महत्त्व सांगताना त्याच्या शांतपणाचे व शरीरावर होणाऱ्या सुखाचे वर्णन केले आहे. आपल्या उपनिषदात अशा झोपेच्या वेळी म्हणायच्या प्रार्थना दिल्या आहेत. त्यातूनच पुढे अरण्यक (अरण्यात लिहिलेली), ब्राह्मणक (ब्राह्मणांनी लिहिलेली) मग वेगवेगळी अठरा पुराणे व अठरा उपपुराणे लिहिली गेली. पुराणे त्या त्या भाषेत गोष्टीरूपात लिहिली आहेत.

पूर्वीच्या काळी (म्हणजे अगदी १९६०-७० सालापर्यंत अनेक देवळांत पुराणिक वेगवेगळ्या पुराणांची वाचने करीत व गोष्टीरूपाने सांगत. ती सर्वसामान्य माणसांना समजण्यात सोपी आहेत.

त्यातूनच सगुण साकार रूपात सर्वसामान्यांना देवाची भक्ती किंवा पूजा करण्यात सोयीचे होत असल्यामुळे त्यांचा विश्वास बसण्यात सोयीचे होते. याकरिता निर्गुण, निराकार असलेल्या सृष्टीमधील शक्ती किंवा परमेश्वराचे रूप सामान्य माणसाला कळण्यासाठी सगुण साकार दाखविले आहे. असे शंकराचार्यांनी सिद्धीविनायकाचा जिर्णोद्धार करताना सांगितले. आता माणसाचे मन दाखविता येत नाही असे परमेश्वराचे किंवा या शक्तीचे रूप दाखविता येत नाही. मग या शक्ती आहेत कशावरून ? असा प्रश्न पडणे सहज शक्य आहे. पण आपल्याला अनेक गोष्टी दिसत नाहीत पण जाणवतात कशा ? वीज दिसत नाही पण पंख्याच्या रूपात, दिव्यांच्या रूपात किंवा इतर रूपात जाणवते. 'हवा' आपल्याला दिसत नाही. पण वाऱ्याच्या रूपात जाणवते. मग त्या आहेत की नाहीत असा प्रश्न पडतो.

पण पुढे मानवी प्रगती होतच राहिली. विज्ञानांनी अनेक रहस्ये उलगडली. निसर्ग वेगवेगळ्या रूपात संभाव्य घटनांचे संकेत देत असतो. त्यामुळे मानवी जीवन जास्तीत जास्त सुखी होऊ लागले. कृत्रिम गर्भधारणा जीवोत्पत्ती निर्माण करण्याचे रहस्य शास्त्रज्ञांनी उलगडले. पण अजून कृत्रिम रक्त तयार करण्यात यश आले नाही. मानवी बुद्धीचा जसजसा विकास होत जाईल तसतसे नवीन शोध लागतील. पण विचार करा की एका मुंगीची निर्मिती करणे इतके बारीक बारीक अवयव जिवंत ठेवणे, त्यांच्याकडून कामे करून घेणे किती कठीण आहे. माणसाने रंग निर्माण केले. त्यामध्ये अनेक छटा निर्माण केल्या. पण मोराच्या पिसाचे सौंदर्य ही एक अलौकिक गोष्ट आहे. किंवा फुलांचे रंग व काही फुलांना सुवास ह्या गोष्टी अतिशय आश्चर्यकारक नाहीत का ?

इंग्लंडचे प्रसिद्ध वैज्ञानिक 'स्टिफन हॉकिंग' यांनी विश्वनिर्मितीचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न चालू असून त्यात कदाचित यश मिळेलही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एका प्रचंड स्फोटामधून पृथ्वीची निर्मिती झाली असून तशा प्रकारे स्फोट करून त्याची प्रत्यक्ष शक्यता अजमावण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यातून मानवी जीवन निश्चित सुखी, समृद्ध होण्यास मदत होईल. पण त्याच वेळी अनेक नवीन प्रश्न निर्माण होत आहेतच.

महर्षी वाल्मिकींनी रामायण लिहिले त्यावेळी त्याला विचारण्यात आले की रामायण लिहिण्यास तुला कोणी सांगितले व तू का लिहिलेस ? त्यावर वाल्मिकीने उत्तर दिले की मला स्वप्न संकेत मिळाला व तो खुद्द ब्रह्मदेवाने दिला असावा की मी विश्वाची निर्मिती

करतो. त्यातून अनेक प्राणी, पक्षी, झाडे, सृष्टीची निर्मिती होते.

पण त्यातून मानवाला चांगले आदर्श जीवन कसे जगावे याकरिता रामायणाची निर्मिती कर. कदाचित ही पारलौकिक गोष्ट आहे. वास्तविक वाल्मिकी मुळचा वेगळाच होता. पण असाधारण प्रतिभा, मेहनत, पश्चात बुद्धी या गोष्टींमुळे त्यांनी सुंदर रामायण लिहिले. पुढे तुळशीरामायण व भारतातील सर्व भाषांमध्ये त्याचे रूपांतर तसेच भाषांतर झाले. इतक्या वर्षांनंतरही रामायणाची गोडी कमी झाली नाही. त्यांनी आदर्श राजा, आदर्श पती व राज्यव्यवस्था अशी असावी ह्याचे उदाहरण घालून दिले. अजूनही गीतरामायणाची गोडी अवीट आहे. आता यामध्ये खरा भाग किती हे त्यालाच माहीत. पण आपल्यासारख्या सामान्य माणसांचे जीवन सुखी, समाधानी होण्यास त्याची निश्चित मदत होते. पण एक गोष्ट मात्र निश्चित की जसजसे विज्ञानामुळे अनेक गोष्टींचा शोध लागला, त्यातील कितीतरी गोष्टींची कल्पना, शक्यता आपल्या पूर्वीच्या धर्मग्रंथात आढळते. आता संगणकामुळे युद्धभूमीवर चाललेले युद्ध संजय (आंधळ्या) धृतराष्ट्राला सांगतो हे पूर्वी कवीकल्पना वाटत असे. पण आता शोधामुळे ती वास्तवात उतरली आहे. अशा कल्पना इतक्या पूर्वी सुचणे ही सुद्धा महर्षी व्यासांसारख्या प्रतिभावंतामुळे आपल्याला समजली.

शास्त्रीय शोधांमुळे मानवी जीवन निश्चित सुखी होईल पण त्याला शांत, संयमी, समाधानी होण्यासाठी अशा विविध धर्मग्रंथांची आवश्यकता जाणवते. उपनिषदांमध्ये अनेक शांतिपाठ आहेत. किंवा अशा प्रतिभावंताच्या संकल्पना व लिखाणांमुळे विज्ञानाला चालना मिळते. त्यातून नवीन गोष्टी उत्पन्न होतात. जसे वाफेमुळे स्टिमशिप निर्माण झाली व मानवी प्रवास सुकर झाला. अशा अनेक शोध रहस्यांमुळे मानवी जीवन सुखी होते. सामान्य माणसांना आणखी काय हवे ?



# बहुरंगी दिवाळी

- **श्रावणी भिडे,** इ. १० वी (राजा शिवाजी)
सौजन्य : संवाद

**दीपज्योति परब्रह्म दीपज्योतिजनार्दनः।**
**दीपो हरति पापानि सन्ध्यादीपः नमोऽस्तुते॥**

दिवाळी म्हणजे मनाचा उत्सव. संध्याकाळी दिवा लावताना 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच हे देवा ह्या दिव्याप्रमाणेच आम्हाला तिमिराकडून प्रकाशाकडे ने, आमचं भविष्य या दिव्याप्रमाणे तेजोमय होऊ दे अशी प्रार्थना आपण करतो. लहानपणापासूनच हा सण माझ्या मनाच्या जवळचा आहे. याचा विचार मी करायला लागले तेव्हा कळलं की भारतात मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणारा उत्सव म्हणजे दिवाळी. लहानपणापासून आई, बाबा, आजी, आजोबा यांच्याकडून त्यांच्या लहान-पणीच्या दिवाळीच्या आठवणी मी ऐकत आले आहे. त्याकाळी लवकर उठून कोण फटाके फोडतय याची चढाओढ असायची. दिवाळी आपल्या बरोबर थंडीला घेऊनच येते. पहाटे तर अंधारच असतो. या अंधारात उठून दिसणारे दिवे, उटण्याचा सुवास आणि फराळाचा खमंग वास यामुळे दिवाळी आपलीशी वाटते. आजही दिवाळी तितक्याच उत्साहाने साजरी होते. दिवाळी आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते तो म्हणजे 'लवकर निजे लवकर उठे त्याची आरोग्य ऐश्वर्य लाभे.' दिवाळीत आपल्याला सर्वांना उटणं लावायला आवडतं. पण आपल्या पूर्वजांनी असं का सांगितलं असावं ? तर हिवाळ्यात हवा कोरडी असते. उटण्यात गरम दूध, सुगंधी तेल असल्याने नंतर संपूर्ण हिवाळा त्वचा कोमल राहते. म्हणजेच दिवाळी आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारायला सुद्धा शिकवते. दिवाळी म्हणजे एकोप्याचा सण. एकमेकांमधील संवाद वाढावा म्हणून आपण एकमेकांना फराळाला बोलावतो. सर्वांनी एकत्र यावे, आपल्या पिढीतील कलात्मक दृष्टीकोन वाढावा म्हणून दिवाळी पहाटेचे कार्यक्रम आयोजित केले जातात. एकत्र येऊन आपल्या मनाची, चांगल्या विचारांची देवाणघेवाण करण्याची शिकवण दिवाळी देते. दिवाळी म्हटले की फटाके आलेच आणि तुम्हाला माहिती असेलच की या फटाक्यांमुळे किती प्रदूषण होतं. फटाके उडवायलाच नको असं माझं म्हणणं नाही तर निदान त्याचं प्रमाण कमी व्हायला हवं आणि कुठल्याही चांगल्या कामाची सुरुवात कधीही स्वतःपासून करावी. आपण फटाके कमी करूच पण त्या उरलेल्या पैशांतून दर दिवाळीला एक लहानसं रोपटं लावून त्याचं संगोपन करण्याचा संकल्प करूया. तसेच जवळच्या अनाथाश्रम किंवा वृद्धाश्रमाला भेट देऊन तिथल्या लोकांबरोबर वेळ घालवूया. तुम्हाला पटणार नाही पण आपण त्यांना भेटायला, त्यांच्याबरोबर दिवाळी साजरी करायला लागतो या कल्पनेनेच त्यांना आनंद होईल. या सर्वांची दिवाळी खऱ्या अर्थाने आनंदी करण्याचा प्रयत्न करूया.

जसं दिवाळी म्हणजे फटाके हे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे खरेदी. पण ही खरेदी करताना आपण एक विशेष काळजी घेतली पाहिजे ती म्हणजे आपण जी वस्तू घेतोय ती स्वदेशी आहे का ? आपण अनेकदा ज्या वस्तू खरेदी करतो त्या 'मेड इन चायना' असतात. त्या वस्तू तकलादू असतात आणि म्हणूनच कमी किंमतीत मिळतात. पण ही खरेदी करताना आपण आपल्या देशातील कामगारांचा विचार करतो का ? आपण जेवढा जास्त स्वदेशीचा वापर करू तेवढाच देशात रोजगार वाढेल. म्हणून या दिवाळीत आपण स्वदेशी वस्तूंचा अवलंब करूया. आपले सण, उत्सव आपल्याला फक्त आनंदच देत नाहीत तर अनेक गोष्टीसुद्धा शिकवतात. दिवाळी आपल्याला आनंद, आरोग्य, वैज्ञानिक दृष्टिकोन देते तसेच एकोपा शिकवते. अशी ही दिवाळी जर आपण पर्यावरणपूरक, स्वदेशीचा स्वीकार करून आणि आपल्या संस्कृतीचा आदर करून साजरी केली तर यावर्षीची दिवाळी खऱ्या अर्थाने 'बहुरंगी दिवाळी' ठरेल.

लेखन स्पर्धा २०२०

# सायकल

- सौ. श्रुती कर्वे-भिडे, ठाणे.

सायकल म्हटलं की प्रत्येकाच्या मनात वेगवेगळ्या आठवणी जाग्या होतात. कुणाला सायकलवरून केलेला लांबवरचा प्रवास आठवेल, कुणाला सायकलला घातलेली अंघोळ आठवेल तर कुणाला हरवून पुन्हा सापडलेल्या सायकलचा आनंद आठवेल.



मी लहानपणीच सायकल शिकले. गावात सायकल चालवण्याची मज्जाच काही वेगळी असते. कमी रहदारी, अरुंद रस्ते, दुतर्फा झाडी आणि लांबवर मारलेली सायकल रपेट ! पण मला माझी सायकल मिळाली ती दहावीत !

दि. ७-७-०७ रोजी ती माझ्या आयुष्यात आली. स्वतःच्या वस्तूवर जास्त प्रेम करणं हा मनुष्य स्वभावच ! मी तिला जपू लागले. रोज स्वच्छता, तेल-पाणी सुरू झाले. मग स्वतःची नवी सायकल मिरवत सगळीकडे फिरणं सुरू झालं. अनेक आठवणी जोडल्या जाऊ लागल्या.

क्लासला जाण्यासाठी सायकल घेतलेली असल्याने रोज साधारण चार-साडेचार किलोमीटर मी सायकलवरून जायचे आणि पुन्हा घरी येऊन, पुन्हा सायकल घेऊन शाळेत जायचे. शाळेतही धमाल असायची. आपल्या सायकलला पार्किंग मिळावे म्हणून पटापट आवरून सायकल वेगात चालवून शाळा गाठायची. मधल्या सुट्टीत सगळी मुलं मस्ती करताना अनेकांच्या सायकल्स पाडायचे. मग आपली सायकल कोणी पाडत नाही ना याकडे लक्ष ठेवायचे. त्यासाठी वर्गाच्या खिडकीजवळ सायकल लावायला जागा मिळवायची. अशी शाळेत जपलेली सायकल घेऊन घरी जाताना कधी वाटेत बोरं पाडून खायची ! कधी कधी भावाला घेऊन डबल सीट तर कधी भाऊ आणि मैत्रिणीला घेऊन ट्रिपल सिट घरी यायचं. मी काहीतरी जगावेगळं केल्याचा आनंद मिरवायचा.

एखादी वस्तू आयुष्यात येते तेव्हा ती वस्तू न राहता आपल्या जवळची आपली नातलगच बनते. मग तिची काळजीही तितक्याच आपुलकीने घेतली जाते. तिच्या अंगावरचा एखादा चरासुद्धा काळीज चिरतो. अशीच गोष्ट घडली. मित्र-मैत्रिणींशी खेळताना सायकल रेस लागली. 'कोण कमी वेळात अमूक ठिकाण पार करतंय' हे पाहायचं ठरलं. आपापल्या सायकल्स कशा ग्रेट हे दाखवायचा प्रयत्न ! (घोड्यांच्या शर्यतीत कसे कोणता घोडा वेगवान हे ठरवतात तसं !) स्पर्धेच्या तीन फेऱ्या ठरल्या. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये मी आघाडीवर होते. शेवटची फेरी सुरू झाली. सगळे सायकल पळवत होते. चुरस वाढली होती. अगदी शेवटच्या टप्प्यात आल्यावर खडीवरून (छोटे दगड) सायकल घसरली आणि मी जोरात खाली आपटले. मला जोरदार खरचटलं होतं. पण माझं लक्ष सायकलला कुठे लागलं याकडेच होतं ! तिला काही झालं नाही, माझा हात मात्र रक्ताळला होता. तरीही मला सायकलचा राग आला नाही कारण ती माझी लाडकी मैत्रीण होती.

शाळांना सुट्टी लागली की सगळी भावंडं आमच्याकडे येत असत. समुद्रावर जाऊन छोटी पार्टी, सायकलवरून लांब फेरफटका, सायकल रेसमधली चिटिंग या सगळ्यात सायकल महत्त्वाची साक्षीदार असायची. लांबच्या सामसूम बंगल्याजवळ जायचं ठरलं की मग एका सायकलवर तीन जणं असं जावं लागायचं. मग त्यासाठी सायकलच्या चाकात नीट हवा आहे ना ? बेल नीट वाजतेय ना ? ब्रेक नीट लागतायत ना ? हे सगळं पाहून मग त्या बंगल्यापर्यंत जायला निघायचं. जाताना शर्यत असायची पण येताना सगळेच घाबरून एकत्र घरी यायचो. त्या लांब फेरीला 'भूतबंगला फेरी' असं नाव ठेवलं होतं. कितीही भीती वाटत असली तरी सगळे एकत्र जमल्यावर ही फेरी

झालीच पाहिजे, असा जणू नियमच होता ! त्यामुळे सगळे येणार म्हटल्यावरच आम्ही सायकल जास्त चकचकीत करून ठेवायचो. नंतर अभ्यासाच्या धबडग्यात आणि मोठं होण्याच्या नादात या सगळ्या गमती मागे पडल्या. पण सायकलने मात्र साथ सोडली नाही. माझं उच्चशिक्षण, नोकरी आणि अगदी लग्नही सायकलने पाहिलं. काही काळाने निर्जीव वस्तूही माणसासाठी सजीव होतात याचं माझ्या आयुष्यातलं उदाहरण म्हणजे माझी सायकल ! माझ्या लग्नानंतर जेव्हा सायकल विकली तेव्हा बाबांनी चार-चार वेळा मला विचारलं. मी प्रत्यक्ष समोर नसल्याने बिनधास्त 'विका' असं सांगितलं. पण प्रत्यक्ष जेव्हा गावी गेले आणि अंगणात सायकलची रिकामी जागा दिसली तेव्हा मात्र मनात पोकळी निर्माण झाली. अशी माझी 'ती' निर्जीव असूनही मला तिच्यातल्या सजीवतेची जाणीव देऊन माझ्या आयुष्यातून कायमची निघून गेली.

---

**लेखन स्पर्धा २०२०**

# गजाने केली मजा

- अस्मिता भिडे,
९९६७०५८४७२



भारतात फ्रेंच संस्कृतीची झलक दाखवणारे ठिकाण म्हणजे पाँडिचरी. तिथली फ्रेंच कॉलोनी, विशाल समुद्र किनारे, भव्य चर्चेस पाहायची उत्सुकता होती. त्यामुळे चेन्नई-पाँडिचरी ट्रीप करण्याचे ठरविले. विमानाचे, हॉटेलचे वगैरे बुकिंग झाले आणि आम्ही जाण्याच्या दिवसाची आतुरतेने वाट पाहू लागलो. पण जसजसा जाण्याचा दिवस जवळ येऊ लागला तशी एक भयंकर बातमी कानावर पडली. गजा नावाचे एक तुफानी वादळ तामिळनाडूच्या दिशेने पुढे सरकत होते. हे वादळ मोठा हाहाःकार माजवेल असाच हवामान विभागाचा अंदाज होता. या बातमीने आमचे धाबे दणाणले. तरी देखील काही दिवस मधे असल्याने वाट पाहायचे ठरवले. कधी नव्हे ते आम्ही सर्वजण वेधशाळेच्या बातम्यांचा वेध घेऊ लागलो. बंगालच्या उपसागरातून येणारे हे वादळ चेन्नई व तामिळनाडूच्या अनेक समुद्रकिनाऱ्यांवर धडकणार होते. वादळाची तीव्रता प्रचंड होती. पण आमचे सर्व बुकिंग झाल्यामुळे अचानक जाण्याचा बेत रद्द करणे कठीण होते. बरे ते वादळ तेथून पुढे निघून जाईल अशा आशेवर असताना ते मात्र चक्राकार गतीने तिथेच रेंगाळत होते. जाण्याच्या दोन दिवस आधी चेन्नई-पाँडिचरी हॉटेलना फोन करून तेथील परिस्थिती विचारली. पण तिथे नेहमी एवढाच पाऊस होता. पूर्ण आयुष्यात पाहिल्या नसतील एवढ्या वेळा **weather sites** पाहत होतो. **weather sites** वरील अपडेटस मात्र वादळाची भीषणता दाखवत होते. थोडक्यात हे गजा वादळ आमची मजा बघत होते. पुढचे दोन्ही दिवस हॉटेलवाल्याला फोन करून हैराण केले. अखेर आदल्या दिवशी ठरवले की चेन्नईला जाऊन पाहायचे. पुढे हवामानाचा अंदाज घेऊन पाँडिचरीचे ठरवायचे. जाण्याच्या दिवशी परत एकदा तिथल्या हॉटेलवाल्याला फोन केला. आता तो या मुंबईच्या कस्टमरना चांगले ओळखायला लागला होता. त्याने रात्री पाऊस झाल्याचे सांगितले. पण आमच्या इतके **weather** अपडेट्स तो घेत नसल्याने त्याला ते वादळ पुढे सरकल्याचे माहीत नव्हते. आम्ही विमानाने चेन्नईला पोहोचलो तोपर्यंत ते वादळ तामिळनाडूच्या काही समुद्र किनाऱ्यांना स्पर्श करून पुढे गेले होते. छत्री-रेनकोटच्या बंदोबस्तात पोहोचलेल्या आम्हाला चेन्नईच्या कडक उन्हाचा सामना करावा लागला. पण त्या उन्हाने आमचे दडपण दूर केले आणि पुढची ट्रीप निर्विघ्नपणे पार पडणार याची ग्वाही दिली. दोन्ही ठिकाणचे स्थलदर्शन अगदी मनाप्रमाणे झाले. थोडक्यात काय, गजा वादळाने आमची मजा बघितली तरी आमच्या ट्रीपचा फज्जा उडू दिला नाही ही त्या गजाननाची कृपा.

# अमिताभ नावाचं वलय

– मुग्धा भिडे
सौजन्य : दै. प्रभात (प्रासंगीक)

अभिनयाचा 'शहेनशहा' अमिताभ बच्चन यांचा ११ ऑक्टोबर हा जन्मदिवस. त्यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार मिळाल्याने जो आनंद झाला आहे तो शब्दांत व्यक्त करणं फारच अवघड आहे. खऱ्या अर्थानं त्यांच्या फॅन्ससाठी हा सुवर्ण महोत्सव आहे. या अचाट शक्तीच्या सदाबहार व्यक्तिमत्त्वानं आपल्या अभिनयातून चित्रपट पाहिल्याचं समाधान दिलंच, शिवाय आपले पैसे सार्थकी लागल्याचा मनमुराद आनंदही दिला. आजही त्यांचे कुठले चित्रपट रिलीज होणार असतील तर चाहते त्या चित्रपटाची अगदी चातकासारखी वाट पाहात असतात. कारण त्यांच्या अभिनयातील दाट हिरवाई पाहून आपलं मन एकदम फ्रेश होणार ह्याची चाहत्यांना खात्री असते.

आकाशवाणीनं ज्या आवाजाला, कलाकाराला नाकारलं तो आज सर्वात मोठ्या पुरस्काराचा मानकरी ठरतो आहे. ह्या सारखा दुसरा आनंद नाही. आता हे लिहिताना इतक्यात झालेला 'केबीसी'मधील 'कर्मवीर विशेष भाग' आठवला. त्या भागात पद्मश्री डॉ. बी. रमना राव आले होते. ते म्हणाले की, कोमामध्ये असलेल्या पेशंटने तुमचा नुसता आवाज जरी ऐकला तरी त्याच्या मस्तकात संवेदना जागृत होतील, असा तुमचा आवाज आहे. अशी पसंतीची कॉम्प्लिमेंट मिळायला भाग्य लागतं नाही का ? हे त्यांचे म्हणणं कुणीही कधीही नाकारू शकत नाही.

त्यांचा कुठलाही चित्रपट घ्या. त्यांच्या फॅन्सना त्यातील रोल, संवाद, गाणी कसं सगळं तोंडपाठ असतं. ह्या सुपरस्टारचे सुपरडुपर हिट ठरलेल्या चित्रपटांची पारायणं केलेले फॅन्स जगभरात लाखोंनी काय करोडोंनी आहेत. आजही टीव्ही लावावा आणि रिमोटने चॅनल बदलत असताना जुना किंवा अगदी अलीकडचा बच्चन चित्रपट लागलेला दिसला तर रिमोटचा देखील पटकन पुतळा होतो. ही त्यांनी स्वकष्टानं मिळवलेली अफलातून ताकद आहे. खरंच नुसतं 'अमिताभ' हे नाव घेतलं तरी सकारात्मक शक्तीचं वलय आपल्या सभोवताली तयार होतं. असा हा कलाकार आहे ज्याचे सर्व वयातील फॅन्स आहेत. आजही कुठलंही नवीन काम करताना जणू प्रथमच ते काम हाती घेतलं आहे अशी ते तयारी करतात. सदैव उत्साहित तितकेच प्रफुल्लीत असतात. भूमिकेत जीव ओततात आणि भूमिका अक्षरशः जगतात. कलाकार होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या चित्रपटातील एक एक दृश्याचा वारंवार अभ्यास करावा. ह्या अभिनय शाळेतून शिकावं. तेव्हा कुठं अभिनय मधला 'अ' अंशतः समजू लागेल. इतका काळ जाऊनही आजही हा माणूस सतत व्यग्र असतो. मग चित्रपट, टीव्ही, जाहिरात, लिखाण असो वा सोशल मिडिया असो. सतत कार्यशील राहून सतत नवनवीन शिकण्याची इच्छा जागृत ठेवणारा हा कलाकार आहे.

**माहेरचा मान : दरवर्षी भिडे कुल संमेलनामध्ये माहेरवाशिणींचा सन्मान व्हावा ह्या दृष्टीने प्रतिष्ठानच्या महिला समिती ज्येष्ठ श्रीमती शशीताई घुले (भिडे), पुणे यांनी पुरस्कृत केलेला आणि त्यांच्या आई स्व. सरस्वती भालचंद्र आणि वडील स्व. भालचंद्र भिडे यांच्या स्मरणार्थ 'माहेरचा मान' त्यांनी दिलेल्या देणगीच्या व्याजातून हा माहेरवाशीणींचा सन्मान संमेलनात उपस्थित असणाऱ्या भिडे माहेरवाशिणींमधून 'ड्रॉ' देण्यात येईल.**

लेखांक : भाग १

# एक साहस योग - लेह - लडाख

**सौ. नेहा सातर्डेकर (भिडे) डोंबिवली ह्या नुकत्याच लेह-लडाख सहलीला जाऊन आल्या. त्याचे प्रवासवर्णन एकूण ६ भागांत आहे. ह्या अंकापासून पुढील प्रत्येक अंकात हे भाग देत आहोत.**

गेले काही महिने खरं तर वर्ष लेह-लडाखला जायचा विचार मनात घोळत होता. अनेकांचे अनुभव ऐकून, वाचून एकीकडे कुतुहल ताणले जात होते तर एकीकडे मन साशंक होते. आपल्याला जमेल, झेपेल का हा प्रवास ? फिटनेसच्या नावाने बोंब होतीच त्यात थोडा allergic bronchitis नामक श्वासाचा त्रास असल्यामुळे हे शिवधनुष्य पेलेल का हा एक विचार अस्वस्थ करत होता. पण मग म्हटलं, 'नुसता विचार करत अस्वस्थ होण्यापेक्षा आपण स्वतःला अजमावून का बघू नये ? प्रयत्नच केला नाही तर शक्यता कशी पडताळता येईल ?' २०१८ च्या डिसेंबरमध्ये विचार पक्का झाला आणि २०१९ च्या जून-जुलैला जायचंच असं ठरवून मोकळे झालो. म्हणजे खरं तर तश्या तयारीला लागलो, मानसिक तयारी सोबत शारीरिक तयारी सुद्धा करावी म्हणून सकाळी उठून वॉकला जवळच्या टेकड्या चढायला जाणं, बिल्डिंगचे ७ जिने एका दमात चढणं असे सगळे उद्योग सुरू केले. अनेकांचे अनुभव ऐकून हे सुद्धा कळलं की या सगळ्या गोष्टींचा म्हणावा तेवढा फायदा होईलच असं नाही. कारण मुळात तुमचा स्टॅमिना कितीही चांगला असला तरीही एखाद्याच्या शरीरावर high altitude चा कसा परिणाम होईल हे सांगता येत नाही. एखाद्याची चांगली तब्येत असूनही त्रास होऊ शकतो आणि एखाद्याचा स्टॅमिना चांगला नसला तरीही काहीच त्रास झाला नाही असंही होऊ शकतं. थोडक्यात काय तर आपण आपलं नशीब आजमावायचं. एक नक्की, खूप सकारात्मक विचार सतत करत राहिलो की हे आव्हान पेलायचंच, आत्ता नाही तर मग कधी जमणार ? तेव्हा जायचंच ! बऱ्याच ट्रॅव्हल कंपन्यांकडून कोटेशन मागवून, अनेक वेबसाईट्स, सगळी हॉटेल्स, रिव्ह्यूज या सगळ्यांचा भरपूर अभ्यास करून झाल्यावर एका मित्राच्या रेफरन्सने आलेला एक ट्रॅव्हल एजन्ट नक्की केला आणि त्याच्याकडून खिशाला परवडेल असं कोटेशन मागवून घेतलं. आम्ही readymade टूर न घेता customized टूर आखून घेतली होती. त्यामुळे त्सोमोरिरी लेक, तुर्तुक गाव अशी काही हटके ठिकाणं निवडता आली.

बघता बघता लेह-लडाख सफरीवर जायला पुण्याहून आम्ही तिघे आणि मुंबईहून ६ जणं असे ९ जण तयार झालो. ट्रिप अवघ्या एक महिन्यावर आली असताना अनंत अडचणी आल्या. काकांची तब्येत बरी नाही म्हणून ताईंचं येणं अनिश्चित झालं. माझ्या डोळ्याला कसलंसं इन्फेक्शनचं निमित्त झालं आणि ते बरं होईना. हे सगळं कमी होतं म्हणून की काय किरणला अचानक किडनी स्टोनचा त्रास सुरू झाला. एक आठवडा उरला असताना आता ट्रिपला जाता तरी येतंय की नाही ही धास्ती वाटू लागली. एवढ्या सगळ्या अडीअडचणींवर मात करत शेवटी एकदाचा जायचा दिवस (रात्र उजाडली) उजाडला. पुणे-दिल्ली रात्री १.२० च्या फ्लाईटने दिल्लीला पोचलो आणि पहाटे अजून एक धक्का. मुंबईत कोसळणाऱ्या धो-धो पावसामुळे आणि एक विमान धावपट्टीवर घसरल्यामुळे अनेक उड्डाणे रद्द झाली होती. त्यामुळे मुंबईकरांचे फ्लाईट indefinite delayed झालं होतं. मुंबईकर पोचतायत की नाही की दिवस फुकट जातोय या चिंतेने आम्ही थोडे टेन्शनमध्ये आलो. पण आता प्रार्थना

करण्याशिवाय आमच्या हाती काहीच नव्हते. तेव्हा आमच्या ठरलेल्या विमानाने लेहला पोचून आता मुंबईकरांची वाट बघत बसण्याशिवाय आमच्यापुढे पर्याय नव्हता. प्रत्यक्ष लेहला पोचेपर्यंत काही खरं नाही असं क्षणभर वाटून गेलं. ट्रिपचा पहिला दिवस हा acclimatization अर्थात high altitude च्या हवामानाशी आणि वातावरणाशी जुळवून घ्यायचा होता. डॉक्टरांच्या सल्ल्याने डायमॉक्स नावाची गोळी (वॉटर पिल) २ दिवस आधीपासून घेऊन शारीरिक तयारी सुरू केली होती. प्रवासात हाताशी असाव्यात म्हणून गळ्यात बांधायला पातळ कापडी पिशव्यांमध्ये भीमसेनी कापराच्या वड्या भरून तयार ठेवल्या होत्या. शूज, सॉक्स, हातमोजे, पायमोजे, थर्मल्स, स्वेटर्स, मफलर्स, स्कार्फ, कानटोपी, माकडटोपी, पूल ओव्हर्स असा सगळा जामानिमा तय्यार होता. लेह-लडाखच्या निमित्ताने होते नव्हते ते सगळे थंडीचे कपडे वापरात येणार होते आणि कधी काळी आपण ते घेऊन ठेवल्याचे समाधान मनोमन वाटून गेले.

लेहला फ्लाईट लँड होतानाचा एक मस्त व्हिडिओ घेतला आणि त्या वेगावर स्वार होऊन लेहच्या विमानतळावर उतरताना एकदम भारी वाटू लागलं. समुद्रसपाटीपासून अंदाजे ११५०० फुटांवर असलेल्या लेहमध्ये सकाळी ११ वाजता सूर्य तळपत होता आणि हवेतला सुखद गारवा, हवा विरळ असल्याने जाणवणारा हलकेपणा आणि थोडी हुरहूर अशा अवस्थेतच आम्ही हॉटेलला पोचलो. आमच्या हॉटेलचं नाव "THE KAAL" असं होतं. आता या 'काल'मध्येच आमचा वर्तमान आणि नजिकच्या भविष्यातले काही दिवस आम्ही घालवणार होतो. शेवटी एकदाचं मुंबई लेह विमानाने उड्डाण केल्याचं कळलं आणि आमचा जीव भांड्यात पडला. हॉटेलला गरमागरम चहाने आमचं स्वागत झालं आणि लगेचच रात्रभरचा प्रवास, थकवा यामुळे अगदी गाढ झोप लागली आणि एक-दीड तासाने जाग आली. आमची मुंबईकर मंडळी आली असतील या विचाराने. अंदाजे ३.३० च्या सुमारास मंडळी हॉटेलमध्ये पोचली आणि आम्ही हुश्श केलं. ट्रिपचा कोरम फुल्ल झाल्यामुळे आता ट्रिप निश्चित पार पडणार अशी खात्री वाटू लागली.

संध्याकाळी चहा भजीवर ताव मारून थोडा फेरफटका मारायला बाहेर पडलो. जेमतेम १०० पावलं चाललो असू नसू दम लागायला लागला, थकवा जाणवू लागला. लेह लडाखला जाऊन आलेल्या अनेकांनी सांगितलेल्या अनुभवांवरून (ज्यामध्ये अगदी ताजा अनुभव सांगणारी माझी मैत्रीण अंजली जोशी जी नुकतीच १५ दिवसांपूर्वी लेह लडाखहून परतली होती) थोडं शहाणं होऊन का होईना जास्त दगदग न करता आराम करायचं ठरवलं. अर्थात थोडी हालचाल करून एक जिना चढून सुद्धा खूप दमल्यासारखं वाटू लागलंच होतं. जास्त थकायचं नाही असा विचार करून हॉटेलमध्येच फिरलो आणि जेवायला आलो. सुदैवाने जेवण अत्यंत उत्कृष्ट होतं. अगदी भरपेट नाही पण मन भरून जेवलो आणि लगेच दुसऱ्या दिवशीच्या प्रवासाची बॅग पॅक करून निद्रादेवीच्या आधीन झालो.

(क्रमशः)


## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !

**जानेवारी**

| | |
|---|---|
| श्री. सनिष व सौ. स्मिता भिडे, पुणे | २-०१-८१ |

**फेब्रुवारी**

| | |
|---|---|
| श्री. उमेश व सौ. अपर्णा भिडे, ठाणे | २४-०२-७३ |
| श्री. प्रदीप व सौ. गौरी भिडे, डोंबिवली | १९-०२-९५ |

**मार्च**

| | |
|---|---|
| श्री. दिलीप व सौ. वर्षा भिडे, पुणे | १२-०३-८५ |
| श्री. राजेंद्र व सौ. संपदा भिडे, दादर | २३-०३-९८ |

लेखन स्पर्धा २०२०

# माझे पर्यावरण

- सौ. मीना भिडे-पुरोहित,
कोल्हापूर. मो. ९६२३१००४५२

पर्यावरण रक्षणाचे माझे उपक्रम - फुलपाखरे, निसर्गाच्या आश्चर्यकारक निर्मिती कौशल्याचे सुंदर उदाहरण. कोणालाही भुरळ पडावी अशी रंगसंगती आणि तितकाच त्यांच्या चमत्कृतीपूर्ण जीवन चरित्राचा उत्सव योगायोगानेच आम्ही अनुभवू लागलो त्याचे हे शब्दांकन. सुमारे चार वर्षांपूर्वी आमच्या सदनिकेच्या दारात कुंडीत लावलेल्या कढीपत्त्याच्या झाडोभोवती एक कॉमन मॉरमॉन जातीचे सुंदर फुलपाखरू भिरभिरताना दिसले. लक्षात आल्याप्रमाणेच त्याने त्या झाडावर चार पिवळ्या रंगाची अंडी घातली. मग एक चाळाच लागला आम्हाला त्याची पुढची प्रगती बघायचा. माझ्या पतींना निसर्गाची अतिशय आवड आणि निसर्गाचा अभ्यास असल्याने फुलपाखरांच्या जीवनचक्राची माहिती होती. त्याप्रमाणे कुठल्या झाडावर कोणती फुलपाखरे अंडी घालतात त्या प्रकारची झाडे कुंडीत लावली. अंड्यातून आळ्या बाहेर आल्या की त्या कुंड्या बाल्कनीत ठेवून पक्षी आणि पालींपासून त्यांचे रक्षण करण्यासाठी बाल्कनीला जाळीदार पडदे लावले. असे तयार झाले फुलपाखरांचे प्रसूतिगृह. अळ्यांना भरपूर खाद्य मिळावे अशी व्यवस्था केली. यानंतर आठ दिवसांनी अळ्यांचे कोष होऊन पुढील आठ दिवसांनी त्यातून सुंदर फुलपाखरांनी बहुतेक वेळा आमच्या डोळ्यांसमोर जन्म घेतला आहे. प्रत्येक वेळी जन्मानंतर त्यांना मोकळ्या हवेत उडताना पाहून डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागतात. कोणालाही हा अनुभव घेता येईल. हवी फक्त इच्छाशक्ती. आम्ही अनेकजणांना यासाठी मार्गदर्शन केले आहे. माणसाच्या हस्तक्षेपामुळे फुलपाखरांच्या अधिवासाची अपरिमित हानी होत आहे. त्यामुळे त्यांच्या संवर्धनाला हातभार लावल्याचे समाधान नेहमीच मिळत राहते आहे. याचबरोबर मी सदनिकेच्या गच्चीवर बाग केली आहे. त्यात अगदी गरजेपुरती माती असते. बाकी घरातील भाज्यांचा ओला कचरा, फळांच्या साली यापासून खत तयार करून ते झाडात घालते. त्यामुळे झाडे टवटवीत असतात. मी दसऱ्याला कधीच आपट्याची पाने आणत नाही. त्याऐवजी येणाऱ्यांना लाडू देते. पूजेच्या कलशात कागदाची पाने वापरते. कारण बाजारात आंब्याचे डहाळे ओरबाडून आणलेले असतात. एकंदरीतच मी माझ्या विचारांप्रमाणे पर्यावरण रक्षण करण्याचा प्रयत्न करते आहे.



लेखन स्पर्धा २०२०

# पहिलं-वहिलं

- सौ. अश्विनी अनिरुद्ध भिडे,
पनवेल, ९०९७११९०००

आज अचानक एकाएकी
मानस लागे तेथे विहरू
खेड्यामधले घर कौलारू

या शब्दवाल्मिकी गदिमांच्या ओळी आठवल्या की डोळ्यांसमोर काय चित्र उभं राहतं तुमच्या ? मला विचाराल तर मला माझ्या माहेरचं घर आठवतं. माझं घर अलिबागला आहे. माझं माहेरचं घर असं म्हणायला हवं होतं का मी ? किती सहजपणे माझं घर असं निघालं माझ्या तोंडून. पण खरंच ते अजूनही माझंच घर आहे असं मला मनोमन वाटतं. आपलेपणाची भावना अजूनही आहे त्यात. लग्न झालं, मुलंबाळं झाली, संसार सुरू झाला की मुलींचं माहेर तुटतं, दुरावतं. पण मी किंबहुना माझ्या नवऱ्याने, सासू-सासऱ्यांनी आणि आता मुलांनीसुद्धा तसं होऊ दिलं नाही.



माहेर म्हटलं की आपसुकच मन वाऱ्याच्या वेगाने पिसासारखं हलकं होऊन तरंगत तरंगत भूतकाळात जाऊन पडतं. माझं माहेर अलिबागला आहे. अलिबागच्या जोगळेकर नाका येथे जुनं कौलारू, दुमजली घर अजूनही गेली ८०-८५ वर्षं डौलानं उभं आहे. घर, घरासमोर अंगण, अंगणात दोन्ही बाजूला लावलेली झाडं, मधून दिंडीपर्यंत जाणारी वाट, घरामागे दगडी बांधीव विहीर. सगळं सगळं आठवतं. पूर्वी अंगणात मोठी मोठी नाराळाची झाडंसुद्धा होती. परंतु काळाच्या ओघात बिचारी नामशेष झाली. पूर्वी अंगणात कुठेच बांधीव फरशा घातलेल्या नव्हत्या. अंगणात डाव्या बाजूला एक मोठं पारिजातकाचं (प्राजक्ताचं) झाड होतं. इतकं आवडायचं मला ते ! त्याची ती टपोरी पांढरी फुलं, त्या फुलांना आधार असलेलं केशरी देठ, त्याचा मन मोहून टाकणारा सात्त्विक सुगंध मला खूप आवडायचा. पहाटेच्या अंधारात कोणताही आवाज न करता झाडावरून अलगद ओघळणारं ते प्राजक्ताचं फूल अंगणभर सडा घालायचं. वेडं, स्वतःचं अस्तित्व विसरून रोज न चुकता मातीत मिसळायचं. पण काही वर्षांनी ते झाड वादळात तुटून गेलं. असं वाटलं आपला एखादा मित्रच आपल्याला सोडून गेलाय. खूप वाईट वाटलं. अशीच कालांतराने एक एक झाडं काळाआड निघून गेली. विहीर मात्र शाबूत आहे. विहिरीत अजूनही झरे जिवंत आहेत. समुद्र जवळ असूनही विहिरीतलं पाणी गोड आहे.

माझ्या माहेरी पूर्वी आम्ही सगळे एकत्र राहायचो. आमच्या कुटुंबात माझे आजी आजोबा, आई-बाबा, मी माझा भाऊ, मधले काका-काकू, त्यांची दोन मुलं, धाकटे काका-काकू त्यांचा एक मुलगा असे एकूण १३ जणं आहोत. घरी सगळे सणवार म्हणजे गणपती, गौरी, नागपंचमी, नवरात्र, दिवाळी असे सगळे सण एकत्र जमून साजरे केले जायचे. आम्ही सगळी भावंडं खूप मज्जा करायचो. माझं-तुझं असा भेदभाव नव्हता. सगळेच सारखे वागायचो. आई-वडील दोघेही नोकरी करणारे असल्यामुळे आम्ही भावंडं आणि आजी-आजोबाजवळ वाढलो. आईचं माहेर जवळच 'विद्यानगर'ला असल्यामुळे ते आजी-आजोबापण जाऊन-येऊन असायचे. त्यांच्याकडे आम्ही मे महिन्यात जाऊन राहायचो. आईच्या बाबांना 'तात्या' म्हणायचे. तात्या आजोबांनी सुद्धा घराभोवती बाग फुलवली होती. चिकू, पेरू, आंबा, नारळ, अशी खूप झाडं लावली होती.

अलिबागला फार मोठ्ठा समुद्रकिनारा असल्यामुळे वाळूत खेळणं, किल्ला बनवणं, शंख-शिंपले गोळा करणं असे खेळ व्हायचे. समुद्राच्या लाटांचा धीरगंभीर आवाज अजूनही मनात सलून आहे. माझी प्राथमिक शाळा आणि कॉलेज हे समुद्रकिनाऱ्यावरच होतं. शाळा-कॉलेजच्या आजूबाजूला मोठी सुरूची झाडं होती. अलिबागचा कुलाबा किल्ला, चुंबकीय वेधशाळा, हिराकोट तलाव, सरखेल कान्होजी आंग्रे ह्यांची समाधी व पुतळा ही अलिबागची वैशिष्ट्ये आहेत. माझं माहेरचं घर, माहेरची प्रेमळ माणसं, माहेरचं अंगण, त्या अंगणात खेळलेले भोंडल्याचे धरलेले फेर व गाणी, आईवडिलांची, भावाची माया, त्यांच्याकडून आलेले संस्कार, त्यांच्याबरोबर एकत्र घालवलेले क्षण हे माझ्यासाठी अमूल्य ठेवा आहेत. अगदी हिरेमाणकांना पण त्याची सर नाही. शेवटी माहेरच्या आठवणीतून स्फुरलेल्या काही ओळी मी लिहिल्या आहेत.

आठवणी गहिवरुनी येता
जिथे प्रीतीचा भाव असावा
माउलीच्या मायेसम हळवा
आठवणींचा गाव असावा
तरुवेलींनी वेढून सजले
हिरवे हिरवे अंगण सुंदर

नितळ निळाई आकाशाची
सजले अंबर घेत विसावा
शांत सावल्या तिथे नांदती
ऊन कवडसे नाचती अंगणी
रानकेवड्या बकुळफुलांचा
दरवळतो भवताली परिमळ

खेड्यामधल्या या घरट्याचा
दाटून येई मनात गहिवर
आठवणींच्या दाट धुक्याची
वाटेवरती अवघड घसरण

# मन घेतसे वेध, संगे ज्योतिष्याचा आधार ...!

- सौ. स्नेहल भिडे, ठाणे. ९८१९३९८०४३

'मानसशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र' असं चमकून बघू नका. भविष्य सांगणे, कुंडली पाहणे, हे सुद्धा एक शास्त्रच आहे. आपण शास्त्र कशाला म्हणतो किंवा आपल्याला शास्त्र म्हटलं की काय वाटतं, तर 'एखाद्या विषयाबद्दल असलेली सखोल माहिती म्हणजे शास्त्र !' अशी एक साधी सरळ व्याख्या करता येते. अशी अनेक शास्त्रं आपल्या परिचयाची असतात. जसे गणित, विज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी अनेक शास्त्रांबद्दल आपल्याला थोडीबहुत माहिती असते. तर काहीजण ह्यांचा सखोल अभ्यास करत असतात. प्रत्येक शाखाच्या शाखा-उपशाखा असतात. अनेक कंगोरे असतात आणि आपल्या आवडीनुसार त्यांचं ज्ञान आपण संपादन करत असतो.

'मानसशास्त्र हे माणसाच्या मनाचा आणि त्याच्या वर्तनाचा आभ्यास करणारे शास्त्र' ही व्याख्या १६ व्या शतकात जर्मन तत्त्वज्ञ रूडाल्फ गॉकिल यांनी केली होती. पण त्या काळी मानसशास्त्राचा अभ्यास फार होऊ शकला नाही. 'मानसशास्त्र' शब्द **psyche** (साईकी) व **logus** (लोगस) या शब्दांवरून आलेल्या ग्रीक शब्दाचा अर्थ आत्म्याचे शास्त्र असा आहे. यावरून त्या काळातला या शास्त्रावरचा धार्मिक प्रभाव लक्षात येईल. परंतु काही तत्त्वज्ञांनी यास आक्षेप घेतला. 'आत्मा' ही एक गूढ, अमूर्त, सिद्ध न करता येण्याजोगी संकल्पना आहे. त्यामुळे 'आत्म्याचा' शास्त्रशुद्ध अभ्यास करणे शक्य नाही. त्या काळच्या इतर तत्त्वज्ञांना तो विचार फारसा पटला नाही. ह्याचे महत्त्व लोकांना पटण्यासाठी १९ वे शतक उजाडावे लागले. ज्योतिषशास्त्र आणि त्याचा उगम हा प्राचीन म्हणजे वेदांत काळातील आहे. साधारण पाच हजार वर्षांपूर्वी त्याचा उगम झाला असावा. हिंदू ज्योतिषपद्धती ही हिंदूंचे प्राचीन काळापासून अस्तित्वात असणारे ग्रहनक्षत्रांच्या स्थितीवर बेतलेले एक शास्त्र आहे. ज्योतिष ह्या शब्दाचा स्रोत हा मूळ संस्कृत शब्द 'ज्योति'मध्ये आहे. ज्योति म्हणजे प्रकाश देणारी वस्तू. माणसाच्या जन्मवेळेची आकाशातील ग्रहस्थिती आणि नंतर वेळोवेळी आकाशात निर्माण होणारी ग्रहस्थिती यांचे संयुक्त परिणाम माणसाच्या जीवनावर होतात, असे मानून त्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ज्योतिषशास्त्र होय. दोन्ही शास्त्रे एकाच गोष्टीभोवती फिरताना दिसतात, ते म्हणजे 'मानवी जीवन !' माणसाच्या आयुष्यात त्याचा स्वभाव, राहणीमान, त्याचे इतरांशी असलेले संबंध आणि त्यातून निर्माण होणाऱ्या बऱ्या-वाईट गोष्टी ह्या प्रत्येक घटनेचा त्याच्या आजूबाजूला घडणाऱ्या परिस्थितीचा परिणाम म्हणून घडत असतात. पण मग असं असेल तर यात ज्योतिषाचा भाग काय ? शंका एकदम रास्तच आहे. माणसाच्या आयुष्यात येणारे चढ-उतार आणि बदल यांचं प्रतिबिंब त्याच्या स्वभावात आणि राहणीमानात उमटत असतं. असे होणारे बदल, चढ-उतार ग्रह-ताऱ्यांच्या, नक्षत्रांच्या स्थान व स्थितीचा अभ्यास करून आपण सहज सांगू शकतो.

प्रत्येक शास्त्र हे अभ्यासातूनच उलगडत जाते. म्हणजेच सखोल अभ्यास हा पाया आहे जणू ! आपण आधी म्हटल्याप्रमाणे ग्रह नक्षत्र ह्यांचा अभ्यास हा ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाचा एक मूलभूत घटक आहे. ह्या घटकांचा माणसाच्या जीवनावर प्रचंड परिणाम होत असतो. ग्रह नक्षत्रांचे व्यक्तीच्या कुंडलीतील स्थान, त्या व्यक्तीच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना व त्या घटनांचा परिणाम दर्शवत असते. ग्रह नक्षत्रांच्या कारकत्वावर स्वभाव अवलंबून असतो. मानसशास्त्रात अनेक व्यक्तींचे स्वभाव अभ्यासत असतो. माणसाच्या आयुष्यात एखादी घटना घडते आणि त्या घटनेचे पडसाद त्या व्यक्तीच्या मानसिकतेमधून समजतात, पण

ती घटना घडणार आहे याची शक्यता आपल्याला ज्योतिषशास्त्र सांगू शकते. यासाठी ग्रहांबाबतची ढोबळ माहिती आपण लक्षात घेऊ.

ज्योतिषशास्त्रात ज्या ग्रहाला पित्याचे स्थान बहाल केले आहे तो ग्रह आहे रवि (सूर्य). त्याच्या भोवतीच तर सारे ग्रह, तारे, नक्षत्रे फिरत असतात. ऊर्जेचा स्रोत म्हणून आपण रविकडे पाहतो. विचार करा, एक दिवस सूर्य उगवला नाही तर ! ही साधी कल्पनासुद्धा आपण करू शकत नाही. तर अशा जीवनदायी ग्रहाला ग्रहण लागलेले असेल आणि या ऊर्जादायी ग्राहाची ऊर्जा जर जातकाला योग्य प्रमाणात मिळत नसेल तर त्या माणसाचे जीवन सांगा कसे होईल ? सकारात्मक जीवन कसे जगता येईल ? किंवा अगदी उलट स्थिती असेल तर ? प्रखर किरणांच्या धगीने सारे जीवन जळू लागले तर ? भावनांचा तीव्र प्रक्षोभ होईल. रक्तदाब वाढण्याची शक्यताही वाढेल. रक्ताभिसरणात अडथळे म्हणजे परत मानसिकतेवर आघात. ह्या बिघडलेल्या मानसिकतेवर प्रकर्षाने लक्ष द्यावे लागेल. समुपदेशक म्हणून त्याला मानसिक आधार द्यावा लागेल. त्याचप्रमाणे ज्योतिष्याला त्या जातकाला मार्गदर्शन करावे लागेल. पण मग चंद्रासारखी शीतलता लाभ देईल का ? 'चंद्र' हा ग्रह जरी त्याच्या शीतलतेसाठी प्रसिद्ध असला तरी प्रमाणापेक्षा जास्त शीतलता ही जातकाच्या आयुष्यात एक प्रकारचे शैथिल्य आणत असते. माया ममता ह्या बरोबरच स्वप्नाळूवृत्ती जास्त प्रमाणात जातकाच्या आयुष्यात मानसिक ताणतणाव निर्माण करतात. आत्यंतिक हळवेपणा भावनाशीलताही जाणवते. निर्णयक्षमता कमी होते. म्हणजेच अशी बिघडलेली चंद्राची अवस्था मानसिक रोगांना आमंत्रण देणारी ठरते. 'मंगळ' ग्रह जो लग्नाच्या पत्रिकांमध्ये धुमाकूळ घालणारा आणि उगाचच भीती निर्माण करणारा ग्रह समजला जातो ! योग्य माहितीच्या अभावी ह्याग्रहाचे चांगले पैलू फार कमी माहिती असतात. हा भूमीचा, पराक्रमाचा कारक ग्रह. ह्याच्या उत्तम स्थितीत असण्याचा लाभ जसा जातकाला मिळतो तसाच त्याच्या अयोग्य स्थितीचा फटकाही बसू शकतो. माणसाच्या पराक्रमात अडथळे म्हणजे काही प्रमाणात मनाचा दुबळेपणा, निर्णय क्षमतेत कमतरता अशी स्थिती उद्भवू शकते. अशा वेळी जातकाला ज्योतिष्य सल्ल्याबरोबरच मानसिक आधाराची गरज असते.

नंतर येतो तो 'बुध' बुद्धीचा कारक ग्रह. विचार करा, बुद्धीच्या जोरावर यश मिळवणारा जातक... अचानक बुद्धीभ्रम झाल्यासारखं वागू लागतो. कधी टोकाचे बुद्धिवादी वर्तन करतो तर कधी भ्रमिष्टपणा अनुभवास येतो. हे दोन्ही टोकाचे वर्तन क्लेशदायकच असतात. अशा वेळी कधी बुद्धिभेद करणारे विचार जातकाला सांगावे लागतात. ह्या वेळेस आपल्याला मानसशास्त्राची खूप मदत होते. 'गुरु ब्रह्मा गुरु विष्णू, गुरु देवो महेश्वरा' तर असे हे 'गुरू' महराज ! त्यांची कृपादृष्टी माणसाच्या इच्छा आकांक्षांना नवीन क्षितीज मिळवून देते. सन्मार्गाने ग्रह खूप छान मदत करत असतो. पण तेव्हाच जेव्हा तो उत्तम स्थितीत असतो. एखादी सौंदर्यवती तिच्या सौंदर्याची भुरळ घालून मन रिझवते. पण त्या उत्तम सौंदर्याला शालीनतेचं कोंदण मात्र आवश्यक असते. शुक्र जर वाईट ग्रहांच्या छायेत असेल तर ह्यामुळे सौंदर्याला ग्रहण लागते. सौख्याचा संपत्तीचा, अब्रू यांचा ऱ्हास होतो. त्यामुळे मानसिक आजारांना तोंड द्यावे लागते. लग्नसंसार या सुखाला माणूस पारखा होतो. शुक्र ग्रह जेवढी आकर्षक फळे देतो तेवढाच त्याच्या प्रतिकूल असण्यामुळे दुःखही अनुभवास येते. 'शनी' साडेसाती हा शब्द प्रयोग आपण बऱ्याच वेळा ऐकत असतो. लोकांचे अनुभवही आपल्याला सांगितले जातात. शनी ग्रह खरंतर आपल्या वाईट गुणांची, खोट्या कल्पनांची, चुकीच्या सवयींची साफसफाई करण्याचं काम करत असतो. ह्या चुकीच्या, वाईट सवयी आपलं मन कलुषित करतात. मानसशास्त्रात संयम, शिस्त आणि सद्सद्विवेकबुद्धी यांचा आधार घेऊन माणसाला त्याच्या आयुष्यात येणाऱ्या प्रश्नांवर मार्ग

काढण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. संयतपणे शिस्तबद्ध रीतीने जीवन जगण्याचे धडे देण्यासाठी हे शनिमहाराज साडेसातीच्या रूपात येत असतात. पण शनीच्या ह्या सकारात्मक कारकत्वाबरोबर अजून काही वैगुण्यही आहेत. ज्यामुळे जातकाला भाऊबंदकी, आधीच्या पिढीकडून आलेले काही वाईट अनुभव त्रासदायक ठरू शकतात. जातकाला ह्या सगळ्या गोष्टींचा होणारा त्रास कमी करण्यासाठी मानसिकरित्या भक्कम आधाराची गरज भासते. मानसोपचार/समुपदेशन ह्या माध्यमातून त्याला तो आधार देता येतो. पुढचे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे राहू आणि केतू ! आपण सहज आयुष्यात कधी कधी पटकन राहू-केतूची उपमा देत असतो. ज्योतिष्य भास्त्रात 'राहू-केतू' ह्यांना ग्रह न मानता तोन छेदन बिंदू म्हणून समजले जातात. ते ज्या ग्रहाबरोबर असतील किंवा कुंडलीत ज्या स्थानात असतील तिथे ते त्या स्थानाच्या फलात कमतरता दाखवतात. अर्थात दरवेळी असंच असेल असं नाही. त्यांनाही सकारक बाजू आहे. मानसिकता बिघडण्यासाठी एकटा राहू किंवा केतू जबाबदार कधीच नसतो. जसं की माणसाला मानसिक त्रास हे कोणत्याही एका कारणाने होत नाहीत. त्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य, त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, त्याची आर्थिक, सामाजिक, नैतिक परिस्थिती ह्यांचा अभ्यास करून ठरवणे योग्य असते. ज्योतिष्यशास्त्र अभ्यासक ही एखाद्या व्यक्तीचे प्रश्न कुंडली पाहून सोडविण्याचा प्रयत्न करत असतो तेव्हा वरील सर्व घटकांचा त्याच्या कुंडलीतील स्थानपरत्वे अभ्यास करत असतो. ज्योतिष्य शास्त्राच्या आधारे वर्तवलेले अंदाज आणि त्याची कमी-जास्त तीव्रता जातकाला सांगताना 'मानसशास्त्राचा' खूप चांगला उपयोग करता येतो. अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या मूलभूत गरजा माणसाला मिळाल्या तर त्याचे आयुष्य सुकर होते. ज्योतिष्यशास्त्राच्या अभ्यासक्रमात विविध उपाय सुचवलेले असतात. ते सर्व उपाय जर अभ्यासले तर लक्षात येतं की आपल्या पूर्वजांनी खूप विचारपूर्वक हे उपाय सुचवले आहेत. त्यातील मानसशास्त्राशी जवळीक सांगणारा, 'मन करा रे प्रसन्न' म्हणून आज प्रसिद्ध असलेला मानसिक शांतता आणि समाधान मिळवून देणारा मार्ग आहे नामस्मरण ! कितीही, कुठेही सहज करता येणारा हा उपाय. माणसाची चित्तवृत्ती शांत आणि उल्हसित करणारा साधा-सोपा उपाय ! थोडक्यात काय तर ध्येयापासून लांब गेलेल्या, भरकटलेल्या मनस्थितीला योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न. एखादा जातक जेव्हा ज्योतिष्याकडे आयुष्यात निर्माण झालेले बिकट प्रश्न घेऊन येतो तेव्हा त्याला आधी मानसिक आधाराची गरज असते. जातकाची त्या क्षणी असलेली मानसिक स्थिती अभ्यासून त्याला आधार द्यावा लागतो. सकारात्मक ऊर्जा द्यावी लागते. हे काम जर मानसोपचाराचा अभ्यासक करत असेल तर तो निश्चितच एका सकारात्मक दृष्टिकोनातून करेल. त्या जातकाला न घाबरवता त्याला साध्या, सोप्या भाषेत समजावून सांगेल. मानसशास्त्रातील समुपदेशन हे 'सहवेदने'च्या अनुभूतीच्या पायावर उभे असते. त्या व्यक्तीच्या भूमिकेत शिरून त्याच्या वेदनेचा विचार करावा लागतो. समुपदेशकाकडे किंवा ज्योतिष्य मार्गदर्शकाकडे एखादी व्यक्ती तेव्हाच जाते जेव्हा तिला ह्या त्रासातून मुक्ती हवी असते. असह्य झाल्यावरच माणूस तिथे मदतीसाठी येत असतो. थोडा मानसिक आधार दिला की निम्मा त्रास कमी होतो. उरलेला निम्मा त्रास थोडं मार्गदर्शन देऊन योग्य सकारात्मक प्रतिसाद मिळाला की कमी होऊ लागतो. ह्या सगळ्यासाठी गरज असते ती एका सकारात्मक विचाराची... सहवेदनेची. मग तो समुपदेशक असो वा ज्योतिष्य मार्गदर्शक !

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले.
संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७
RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI * Reg. No. KLR 136/18-20
Posted in Kolhapur RMS

# मंगळसूत्र

– सौ. सुप्रिया प्रशांत भिडे,
सातारा, ९४२३८६६१७०

'मंगळसूत्र' या पाच अक्षरी शब्दामागे खूप मोठा गहन अर्थ दडला आहे. सूत्र म्हणजे धागा. काही चांगल्या गोष्टी, मंगल गोष्टी एकत्रित बांधून ठेवण्यासाठी वापरतात तो धागा म्हणजेच मंगळसूत्र.

मंगळसुत्राच्या दोन वाट्या म्हणजे सासर-माहेर या दोन्ही जिव्हाळ्याच्या घरांना, तिथल्या माणसांना कायम हृदयात जागा देणे आणि काळे मणी म्हणजे या सगळ्या वैभवाला, नात्याला कोणाचीही दृष्ट लागू नये म्हणून त्या काळ्या मण्यांची गुंफण केली असावी असे मला वाटते. या मंगळसुत्रामुळे आपल्याला कितीतरी नवीन नाती मिळतात. आपण फक्त कोणाची बायको होत नाही तर मामी, काकी, वहिनी अशी कितीतरी विशेषणे आपल्याला मिळतात. या मंगळसूत्राची प्रथा कोणी सुरू केली हे नक्की माहीत नाही पण त्यामागे खूप सुंदर, गहन अर्थ होता हे नक्की. श्रीमंत, गरीब, नोकरी करणारी, व्यवसाय करणारी कोणतीही स्त्री असो, तिला आपल्या या मंगळसुत्राचा खूप अभिमान असतो. ती या दागिन्यासाठी खूप हळवी पण असते. क्वचित ते हरवते, वाढते पण स्त्रीमनाची त्यामुळे खूपच चलबिचल होते. हल्ली या नव्या फॅशनच्या जमान्यात काही मुली मंगळसुत्राला नाक मुरडतात. ओल्ड फॅशन म्हणतात. पण मला असं वाटतं, आपल्या प्रिय सख्याची आठवण कायम जवळ बाळगायला काय हरकत आहे ? तरी सुद्धा या फॅशनच्या जमान्यात मंगळसुत्राचे स्थान खूप वरचे आहे. प्रत्येक मालिकेत मंगळसुत्राचा तर एक नवीन ट्रेंड येतो. अक्कासाहेबांचे मोठे मंगळसूत्र, जान्हवीचे तिहेरी छोटे नाजूक मंगळसूत्र, तर राधिकाचे नथीचे मंगळसूत्र. मला वाटते आयुष्यभर एकच मंगळसूत्र वापरलेली बाई शोधून सापडणार नाही. नवीन डिझाईनची, फॅशनची, मॅचिंगची, डायमंडची अशी बरीच यादी प्रत्येकीकडे नक्की असणार. सोनाराकडे गेल्यावर आपण बाकीच्या दागिन्यांच्या वजनात थोडी घासाघीस करू, पण मंगळसूत्र बाकी ठसठशीतच पाहिजे, टिकाऊ, दणकट नाही का ? स्त्रीच्या भावविश्वात मंगळसुत्राला एक मानाचे स्थान तर उखाण्यात याला मोठाच मान !

एक नवविवाहिता म्हणेल,

*गणरायाच्या शिरावर शोभते हिऱ्या माणकांचे छत्र*
*... रावांच्या नावाने बांधले मी मंगळसूत्र*

एखादी गरीब बाई म्हणेल,

*गोड भाषा कंठमणी माझा, काळ्या मण्यांची पोत सांगे*
*जीवनसाथी हाच माझा राजा*

तर कॉलेजकुमारी म्हणेल,

*माझ्या सभोवती आहेत खूपच मैत्रिणी आणि मित्र*
*पण मलाच कळत नाहीये कोणाच्या नावाने मी घालू मंगळसूत्र*

एखादी संसारात तृप्त असलेली, मुलाबाळात रमलेली, खानदानी स्त्री म्हणेल,

*चांदीच्या करंड्याला मोत्यांचे झाकण, करंड्यातील*
*कुंकू सौभाग्याचे लक्षण, सोन्यासारख्या संसारात*
*माणिकपाचू सारखी मुले, या साऱ्यांमुळे आमचा संसार*
*फुले असाच वृद्धिंगत होत राहो*

तर असा हा सुंदर मौल्यवान दागिना समस्त स्त्रियांच्या भावविश्वावर अलवारपणे आरुढ झाला आहे. पण या सगळ्याला एक काळिमेची पण झालर आहे. कारण या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला या मंगळसुत्राचा उपयोग आपले स्वतःचे संरक्षण करण्यासाठी पण होतो. गळ्यात मंगळसूत्र असेल तर ती स्वतःला खूप सुरक्षित समजते. नोकरी करत असेल तर तेथील सहकारी, प्रवासातील शेजारी, तसेच जर ती खेड्यापाड्यात

नोकरीसाठी जात असेल तर तिला नक्कीच या मंगळसुत्राचा ढालीसारखा उपयोग होतो. खेड्यात अजूनही स्त्रीला दुय्यम स्थानीच पाहिले जाते. स्त्री कितीही सक्षम, कर्तृत्ववान असली तरी तिला समाजाची ही काळी बाजू बघावीच लागते. पूर्वीच्या काळी विधवा स्त्रियांना सौभाग्यलेणे वापरण्याचा हक्क नव्हता. घराबाहेर पडण्याची मुभा नव्हती. पण आता काळ खूप बदलला आहे. स्त्रीच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. ती खूप सक्षम झाली आहे. सर्वच क्षेत्रात ती आघाडीवर आहे. तरी सुद्धा ती आपल्या रूढी परंपरा विसरलेली नाही. त्यामुळे तिच्या भावविश्वात या मंगळसुत्राला नक्कीच खूप मानाचे व अढळ स्थान आहे.

### .....आर्थिक मदत.....

१) चि. अथर्व सुनिल भिडे, पुणे ह्या विद्यार्थ्यास रुपये १०,००० शैक्षणिक मदत देण्यात आली.

२) श्री. मंदार व मोहिनी भिडे, डोंबिवली यांची मुलगी कु. नियती मंदार भिडे, डोंबिवली हिला खेळास प्रोत्साहन म्हणून रुपये १०,००० ची आर्थिक मदत नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून देण्यात आली.

# विवाह सुवर्णोत्सव

**श्री. अरुण व सौ. अरुणा भिडे, नाशिक**

**यांना विवाह सुवर्णोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !**

**विवाह दि. ५ जून १९६९**



चि. आणि चि. सौ. कां. पन्नास वर्षे एकत्र
सासू-सासरे, आई-वडील होते प्रेमळ माया छत्र
आयुष्याच्या माध्याह्नी जरी तळपत होता सूर्य वर
चार हातांच्या सावलीने जपले कोवळे अंकुर
कधी सोसले तप्त उन्हाळे वाहत होते वारे उष्ण
परी बरसल्या श्रावणसरी अन् शांतवले ते सारे प्रश्न
आता उतरण सुरू जाहली देऊ एक दुजाला हात
सांजवेळ ही शीतल झाली पाखरांची सुरीली साद
तृप्त जाहल्या साऱ्या मनीषा नसे कशाची उरली आस
कृपा ईशा रे तुझी असूदे सतत राहूदे मनी उल्हास

**शैक्षणिक मदत :** भिडे प्रतिष्ठानचे माजी लेखापरिक्षक श्री. विजयराव रघुनाथ आणि त्यांचे बंधू श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे यांनी आपले वडील स्व. रघुनाथ व्यंकटेश आणि आई स्व. मालती रघुनाथ भिडे, ठाणे यांचे स्मरणार्थ 'भिडे प्रतिष्ठान'कडे **शैक्षणिक निधी** म्हणून विद्यार्थिनींसाठी प्रत्येकी रोख रु. ११,००० असे एकूण रु. २२,००० दिलेले आहेत. अशा प्रकारे शैक्षणिक निधीसाठी मदत म्हणून दर वर्षी ते देत आहेत. त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा पनवेल येथे जानेवारी २०२० मध्ये होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात ही आर्थिक मदत पुढील विद्यार्थिनींना देण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. चैताली संजय भिडे, सांगली | ४,००० रु. | ३) कु. अश्विनी भिडे, पुट्टुर, कर्नाटक | ५,००० रु. |
| २) कु. समिधा मुकुंद भिडे, चिपळूण | ५,००० रु. | ४) कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली | ४,००० रु. |
| | | ५) कु. आस्था केदार भिडे, पुणे | ४,००० रु. |

# दुःख चांगले आहे !!!

- **राजेंद्र म. भिडे**, दादर, मुंबई
मो. ९९२०९६९३२८

एखादी गोष्ट चांगली असे आपण कधी म्हणतो, जेव्हा त्यामुळे आपली प्रगती होते किंवा आपल्या जीवनाला सकारात्मक वळण लागतं. मग ती गोष्ट म्हणजे एखादे दुःख असेल तरी ते चांगलेच म्हणावे लागेल. आता, आपलं आयुष्य म्हटलं तर सुख-दुःखाचा लपंडाव हा आलाच. तसं पाहिलं तर प्रत्येक मनुष्य हा कमीअधिक प्रमाणात दुःखी असतोच. समर्थ रामदासस्वामी दासबोधात सांगतात, जन्म दुःखाचा अंकुर। जन्म शोकाचा सागर। जन्म भयाचा डोंगर। चळेना ऐसा॥ आता काय करायचं ? बरेचदा आपण दुःख आणि जीवनातील अडचणींना सारखंच समजतो. आपली साधी स्कूटर किंवा गाडी रस्त्यात बंद पडली तरी त्याचं खापर आपण कोणावर तरी फोडतो. कधी तर छोट्या अडचणींना आपण डोंगराएवढं मोठं करून ठेवतो आणि मग त्या पार करणंच कठीण होऊन बसतं. अडचणींवर आपल्या कर्तृत्वाने मात करायची असते, पण दुःखाला सामोरंच जावं लागतं.

कुठलीही व्याधी उद्भवली की आपली पहिली धाव असते डॉक्टरकडे आणि दुसरी देवाकडे. सर्व प्रयत्न करून झाले की आपल्याला कळतं की ही व्याधी कमी होण्यासाठी काही काळ जावा लागेल. नाथमहाराज म्हणतात, वेचुनी प्रारब्धाचा साठां। निजात्मतटा काढिती॥ म्हणजे हे दुःख भोगूनच संपवायचं असतं. जर आपल्या वाट्याला आलेली शारीरिक व्याधी हे प्रारब्ध आहे तर मग रडत का राहायचं ? संत नेहमी सांगतात, आपल्या कर्मानुसार आपल्याला सुख किंवा दुःख मिळत असतं. आपण जर कुणाला दुःख दिलं असेल तर त्याचं फळ आपल्याला दुःख दिल्याशिवाय राहात नाही. जर सुख दिलं असेल, तर त्या कर्माचं आपल्याला फळ म्हणून सुखच मिळते. ते सुखदुःख आपल्या मनाशी आणि शरीराशी निगडीत असतं. जोपर्यंत आपण देहात आहोत तोपर्यंत, भोग सुटणार नाहीत. पण श्रीभगवंतांच्या कृपेने देहाची जाणीव सुटली तर भोग होणारच नाहीत. जीवनात दुःखं येतील पण ती जाणवणार नाहीत. संतशिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे॥ एक कुणबी विठ्ठलाची सगुण भक्ती करतो, अभंग रचतो, हे त्याकाळच्या काही ज्ञानी लोकांना रुचले नाही. म्हणून त्यांनी तुकोबांना गाढवावर बसवून गावभर फिरवले. एखादा सामान्य माणूस मनाने खचून गेला असता. पण महाराज म्हणाले अरे इतकी वर्षे या गावात राहतोय पण पूर्ण गाव पाहिलाच नव्हता आणि आज मला सगळे गावकरी ही ओळखायला लागले. ठेविले अनंते तैसेचि राहावे असा संदेश देणारे तुकोबा, प्रारब्धाचा खूप मोठा भोग भोगूनसुद्धा संत पदावर पोचले. म्हणजेच दुःख अपरिहार्य म्हणून स्वीकारा असेच ते सांगून गेले. हे दुःख निपटून काढायला आत्मशक्ती आपल्याला श्रीभगवंतच देत असतात. पण त्यासाठी त्यांची कृपा व्हावी लागते. आपल्याला तर फास्ट रिलीफची सवय झालेली आहे. औषध घेतलं की ताबडतोप बरं वाटलं पाहिजे. तसंच देवळात गेलं की लगेच आपली दुःखापासून मुक्तता व्हावी असे वाटते. मग ज्याची आपण सेवा करायची त्याच सर्वेश्वराला आपण आपले दुःख निवारण करण्याच्या कामाला लावतो. पण श्रीभगवंताना समजणं सोपं नाही. असं म्हणतात, ग्रंथ वाचल्याशिवाय पंथ



भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा ------
अनंतरंग आर्ट फौंडेशन, पुणे - संचालित

अनंतरंग
आर्ट इन्स्टिट्यूट

- शास्त्रोक्त तबला वादन वर्ग
- मराठी व इंग्रजी हस्ताक्षर सुधारणा वर्ग
- ड्रॉइंग व पेंटिंग क्लासेस
  (पेन्सिल शेडिंग, चारकोल, कलर पेन्सिल्स्, वॉटर कलर, ऑईल पेंटिंग इ.)
- तसेच कलात्मक फोटोग्राफीची कामे केली जातील.

संचालक : चित्रगुप्त भिडे
मो.:९८२२१ ९९०५७
**E-mail:** chitraguptabhide15@gmail.com

With Best Comliments From :

# MARS
## TEXTURES
Painting & Textures Contractors

**Ajit Bhide**
**Mo.: 98220 53231**

**Shreekant Ranbhor**
**Mo.: 94223 09380**

Office : Bld. No.2, Flat No. 2,
Daulat Co-op. Soc., Karishma Square,
Karve Road, Pune - 411038

Telefax : 020-25442013
email : marstextures23@rediffmail.com

With Best Comliments From :

# KARMA ENTERPRISES

**Siddharth S. Bhide**
1934, Sadashiv Peth, 'Manik',
Madiwale Colony, Pune - 411 030.
Mobile : +91-7798311503
Enterprises_karma@yahoo.com

समजत नाही, आणि संतसंग झाल्याशिवाय भगवंत समजत नाहीत. म्हणून संतसंग हाच दुःख निवारणावर रामबाण उपाय आहे. आज ज्याचा राज्याभिषेक आहे त्या श्रीरामाला अचानक वल्कलं नेसून वनात जावं लागतं. एखादा सामान्य व्यक्ती घाबरून गेला असता. पण धैर्यवान श्रीराम वनात गेले, तिथे राहिले, अनेक ऋषीमुनींना भेटले, ज्ञान प्राप्ती केली, दुष्टांचा संहार केला. ते अयोध्येतून वनात जायला निघाले तेव्हा ते राजकुमार श्रीराम होते, पण वनवासातून १४ वर्षांनी परत आले, ते मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम म्हणून. कौरव-पांडव युद्ध संपल्यावर महाराणी कुंती श्रीकृष्णाला म्हणाली, आम्ही वनवासात असताना सतत तुझी आठवण करत होतो आणि तू आमच्या हाकेला नेहमी धावून देखील आलास. पण आता ह्या सुखाच्या काळात, आम्हाला तुझा विसर तर पडणार नाही ना अशी भीती वाटते. जो वनवास, जे दुःख आम्हाला सतत तुझी आठवण करून देत होतं ते खरंच चांगलं होतं.

अब्राहम लिंकन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले व प्रथमच आपल्या अध्यक्षीय भाषणासाठी उभे राहिले. त्याचवेळी समोरून एक प्रतिष्ठित व्यक्ती सर्वांसमोर उभी राहिली आणि म्हणाली, ‘अहो लिंकन तुम्ही राष्ट्राध्यक्ष झालात तरी तुमच्या वडिलांनी शिवलेले जोडे आम्ही घालतो हे विसरू नका.’ यावर ताबडतोब उत्तर देणं हे कठीण होतं. पण लिंकनने त्याच्याकडे रोखून बघितलं आणि म्हणाले, ‘शक्यता आहे की इथे अजूनही काही उपस्थित असतील ज्यांनी माझ्या वडिलांनी शिवलेले जोडे घातले असतील. मला माझ्या वडिलांचा खरंच अभिमान आहे. कारण मला माहीत आहे की, त्यांच्यासारखे जोडे कोणीच शिवू शकत नाही.’ आणि ह्या प्रसंगानेच त्यांना यशस्वी राष्ट्राध्यक्ष होण्याची आत्मशक्ती दिली असेल. दुःखातून बाहेर पडायचं असेल तर पहिल्यांदा आपल्याला सुखाची व्याख्या समजून घ्यायला लागेल. खरंतर दोन दुःखांच्या मधल्या काळाला सुख म्हटलं तर वावगं ठरणार नाही. सुखाचा आनंद लुटताना जसं दुःख विसरावं लागतं, तसंच दुःखातून बाहेर पडायचा मार्ग हा सुखाला दूर लोटूनच होतो. सुखाची ओळख आपल्याला दुःखच करून देतं, मग दुःख चांगलंच आहे ना ? जे दुःख आपल्याला सुखाची ओळख करून देते ते वाईट कसं असेल ? जे दुःख आपल्या आचार विचार आहारात सुधारणा करवतं ते वाईट कसं असेल ? जे दुःख आपल्याला आपलं हित कशात आहे ते समजून सांगतं ते वाईट कसं असेल ? जे दुःख आपल्याला श्रीभगवंतांची भक्ती करायला शिकवते ते वाईट कसं असेल ? दुःख हा यशाचा सर्वात जवळचा मित्र आहे, कारण त्याला कवटाळल्याशिवाय यशाचा मनोरा चढणे केवळ अशक्य आहे. मग हे दुःख आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे अशी मनाची तयारी करून जगायला शिकायचं, का त्याचीच पायरी करून यशाचा मनोरा चढायचा हे आपल्यालाच ठरवायचं. एक मात्र नक्की, की आजचे दुःख हे पुढे येणाऱ्या सुखाची चाहुल असते. म्हणून दुःख चांगलं आहे.

## वैद्यकीय मदत

१) श्री. उदय मधुकर भिडे, जुन्नर यांच्या किडनी ट्रान्सप्लांटसाठी भिडे प्रतिष्ठानकडून ऑपरेशनचे अगोदरच्या खर्चासाठी जमलेल्या मदतीपैकी रुपये २५,००० वैद्यकीय मदत त्यांचे वडील श्री. मधुकरराव यांचेकडे तातडीने जमा केली. उर्वरित रक्कम प्रतिष्ठानकडून त्यांना ऑपरेशनचे वेळेस देणार आहोत.

२) श्री. यशवंत पुरुषोत्तम भिडे, पुणे यांना त्यांच्या ऑपरेशनसाठी रु. १५,००० देण्यात आले. श्री. यशवंतराव यांची आर्थिक परस्थिती बेताचीच असल्यामुळे आणि सर्व कुटुंबाची जबाबदारी त्यांचेवर असल्यामुळे त्यांना मदत देऊ केली.

# अंक परत येणारे पत्ते....

गेल्या वर्षात सुमारे ३० पेक्षा जास्त 'आम्ही भिडे' अंक बदललेला पत्ता, किंवा अन्य कारणाने परत येत आहेत. आमच्याकडे परत आलेल्या अंकाचे पुनर्वितरण केले जाणार नाही. परंतु आपल्या माहितीकरिता खाली दिलेल्या यादीनुसार खालील व्यक्तींनी आपला नवीन अथवा बदललेला पत्ता आम्हाला लेखी पत्राने किंवा एस.एम.एस. करून खालील मोबाईलवर कळविल्यास पुढील अंकाचे वितरण आलेल्या पत्त्यानुसार केले जाईल, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

**दिलीप भिडे (पुणे),९६५७५४१२३६** **ले.क. सुनिल भिडे (पुणे),९६२३०१७४४४**
**प्रदीप भिडे (डोंबिवली), ९८९२५०४०४२** **सौ. संपदा भिडे (दादर), ९८१९९५१३९१**

<u>मुंबई विभाग</u>

**श्री. माधव गणेश भिडे**
एस.डी. कॉर्पोरेशन, ट्रस्टी पार्टनर
ठाकूर कॉलेज समोर, ठाकूर व्हिलेज
कांदिवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१

**श्री. सुरेश गोविंद भिडे**
३/३९, अहमद सेलर बिल्डिंग
नायगांव, दादर, मुंबई ४०० ०१४.

३१२५ **श्री. मेघःशाम गोविंद भिडे**
बिल्डिंग नं. ५, प्लॉट नं. २०,
मार्गदर्शन सोसयटी, ना. सी. फडके मार्ग
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९

**सौ. अलका साठे**
जिजामाता उद्यानजवळ, ठाणे (पूर्व)

**श्री. जे. एम. भिडे**
ग्रीन फिल्ड सोसायटी, ६५३, आर. रायकर मार्ग,
माहीम, मुंबई ४०० ०१६.

३३०२ **श्री. आनंद आत्माराम भिडे**
१४, बेस्ट ऑफिसर्स क्वार्टर्स, सुपारी बाग,
परेल, मुंबई ४०० ०१२.

**श्री. जगन्नाथ पांडुरंग भिडे**
१९, हेमादर्शन, एलआयसी कॉलनी,
डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, मुंबई ४०० ०८०.

**श्री. अशोक काशिनाथ भिडे**
२८/ब, सुगंध, नंदधाम समोर, बी. परब रोड,
कांदरपाडा, दहीसर, मुंबई ४०० ०६८

<u>ठाणे विभाग</u>

७२५५ **श्री. मधुसुदन सदाशिव भिडे**
बी/२०४, चिनार सोसायटी, फ्रान्सिस शेल जवळ,
समता नगर, वसई, ठाणे ४०१ २०२

७३६५ **श्री. विष्णू दत्तात्रय भिडे**
मानस, ९, ए विंग, तिसरा मजला,
दाजी रामचंद्र रोड, चरई, ठाणे - ४०० ४०१

२१०७ **श्रीमती उषा विष्णू भिडे**
मानसीछाया, ए विंग, तिसरा मजला,
ब्लॉक नं. ३१, दाजी रामचंद्र रोड,
चरई, ठाणे ४०० ६०१

<u>पनवेल विभाग</u>

३००७ **श्री. मोरेश्वर परशुराम भिडे**
नवांकुर हौसिंग सोसायटी,
पनवेल, जि. रायगड ४१० २०६

**श्री. भूषण शाम भिडे**
५०६, ए, निळकंठ पार्क, खांदेश्वर मंदिराजवळ,
सेक्टर नं. ६, प्लॉट नं. १८, खांडा कॉलनी,
न्यू पनवेल, जि. रायगड

**श्री. एस. एस. भिडे**
५, कावेरी सोसायटी, प्रताप रोड,
परदेशी आळी, पनवेल - ४१० २०६.

**श्री. सुधाकर गणेश भिडे**
५, कावेरी सोसायटी, प्रताप रोड,
परदेशी आळी, श्री लॉजजवळ,
पनवेल, जि. रायगड - ४१० २०६.

__सांगली-मिरज विभाग__

**श्री. गोपाळकृष्ण दत्तात्रय भिडे**
२८२१/४ डी, मराठा मिल मार्ग,
मिरज, सांगली.

८०८९ **श्री. कपिल गोपाळकृष्ण भिडे**
मराठा मिल रोड, हाऊस नं. २८२१,
मिरज, जि. सांगली.

७०२७ **श्री. दत्तात्रय विष्णू भिडे**
२८२१/४ डी, मराठा मिल रोड,
मिरज, सांगली.

__नाशिक विभाग__

७१४९ **श्री. वसंत केशव भिडे**
श्री बंगला, लोहीयानगर मागे, गंगावाडी,
गणेशनगर, ओझर मिग, नाशिक ४२२ ००१.

**श्री. दिलीप व्ही. भिडे**
लक्ष्मी वाडी, पिंपळगांव बसवंत, नाशिक.

**श्री. जयंत एल. भिडे**
४१६, मालेगांवकर, मोरेश्वर गणपती मंदिराजवळ,
आसुराची वेस, नाशिक - ४२२ ००१.

__नागपूर विभाग__

३०४० **श्री. बाळकृष्ण व्ही. भिडे**
६४, साहस बिल्डिंग, बजाजनगर,
जी.टी.-२, नागपूर - ४०० ०१०.

__सातारा विभाग__

७११४ **श्री. दामोदर बाळकृष्ण भिडे**
७२, भवानी पेठ, सातारा ४१५ ००२.

__पुणे विभाग__

**श्रीमती सुमती वसंत भिडे**
३३/२८, प्रभात रोड, गल्ली नं. ४,
लिज्जत पापडजवळ,एरंडवणे, पुणे ४११ ००४.

**श्री. अभिजित निळकंठ भिडे**
४६३, शिवाजीनगर, ए/३, ब्ल्यू बर्ड सोसायटी,
मॉडेल कॉलनी, पुणे ४११ ०१६.

**श्री. विवेक नरसिंह भिडे**
श्रुती अपार्टमेंट, ४ था मजला,
ताथवडे उद्यानाजवळ, पुणे ४११ ०५२

**श्री. निळकंठ एस. भिडे**
ए/३, ब्ल्यू बर्ड सोसायटी,
शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

**श्री. रविकिरण दत्तात्रय भिडे**
७५९/७५, डेक्कन जिमखाना,
पुणे ४११ ००४

**श्री. पी. के. भिडे**
ब्लॉक नं. ११, गोयल कॉर्नर, काकडे पार्क,
चिंचवड, पुणे - ४११ ०३३.

**श्री. संदीप पांडुरंग भिडे**
२८४/११, गोयल कॉर्नर,
चिंचवड पुणे - ४११ ०३३.

**श्री. सदाशिव दत्तात्रय भिडे**
१३६, श्रीनिवास सोसायटी, सी.डी.एस.एस.जवळ,
एरंडवणे, पुणे - ४११ ००४.

**श्री. माधव नारायण भिडे**
५, गृहकल्प अपार्टमेंट, कर्वे रोड,
पुणे - ४११ ००४.

__रत्नागिरी विभाग__

**श्री. राजेंद्र दत्तात्रय भिडे**
७२१/ए, कमलकुंज, आरोग्य मंदिर,
शिवाजीनगर, रत्नागिरी - ४१५ ६१२.

**गुजरात विभाग**

**डॉ. शुभदा पी. भिडे**
४/बी, रेल्वे कॉलनी, पी.नगर,
बडोदा, गुजराथ - ३९० ००४.

**श्री. श्रीकांत पांडुरंग भिडे**
११७, सेक्टर नं. २५, गांधीनगर,
अहमदाबाद, गुजराथ.

**श्री. जयंत वसंत भिडे**
११७, सेक्टर नं. २५, गांधीनगर,
अहमदाबाद, गुजराथ.

**कर्नाटक विभाग**

**कु. अश्विनी अशोक भिडे**
२/१४४, ऐश्वर्या थोटा बँगेका होम
बस नाडण व्हिलेज, दक्षिण कर्नाटक, पुट्टुर

**मध्यप्रदेश विभाग**

**सौ. इंदू व्हि. भिडे द्वारा डॉ. अजित भिडे**
७९, अमरज्योती कॉलनी, संजयनगर,
बऱ्हाणपूर, मध्यप्रदेश.

**गोवा विभाग**

**श्री. संतोष भिडे द्वारा कुणकोल्लीकर**
फ्लॅट नं. ३, दुसरा मजला,
सिद्धिविनायक बिल्डिंग तिस्क,
फोंडा, गोवा ४०३ ४०६

## कविता कविता कविता

सुखाचे सोबती सारे असे हे
कुणी दुःख का घेते कुणाचे
तरी अपेक्षा तू करीसी उगा रे
सुखाचे भागीदार होतील सारे
नको वाट पाहू फुका कुणाची
कुणालाच नसे त्याचे देणे-घेणे
सुखासाठीच जळे प्रत्येक जीव
परि ते तयाला मिळते कुठे रे
युगानुयुगे हा लपंडाव चाले
कुणाचीच भेट ना होत आहे
प्रयत्नात जाती किती ते निष्पाप
हिशोब कुणी तो ठेवला आहे
तरीही नव्याने मागतो मागणे रे
दुःखाचे दान जरी पडणार आहे
नको भुलवूस असा तू रे स्वतःला
मोक्षाचे द्वार सदा खुलेच आहे
मिळे सर्वथा हा मोक्ष कसा रे
सांगतो ऐक मी हे सारे तुला रे
षडरिपुंना ठेव बांधून मनी ते
मनाचे स्वैर वारू उधळू नको रे

**- स्नेहल भिडे, ठाणे**

## आदिमाया गीत

रुणझुण रुणझुण (२दा)
वाजती पैंजण अंबा येई घरा।
रुणझुण रुणझुण (२दा)
नादती पैंजण अंबा येई घरा।
(२दा) होऽ अंबा येई घरा॥ध्रु०॥
मखर सजविले देव्हाऱ्यावरी
केली तोरणे महाद्वारी
देव्हाऱ्यामध्ये दुर्गा स्थापिली
नवरात्रीचा हा महोत्सव।
शौर्य शक्तीचा हा तर उत्सव।
शक्तीरुपिणी आदिमाया
दुर्गा येई घरा॥ रुणझुण...॥१॥
अंबाल्याली शालू जरतारी
हिरवी कांकणे हिरवी काचोळी
नवरत्नांचा हार ल्याली
नथ ही लफ्फेदार॥ रुणझुण...॥२॥
हीच शारदा विणावादिनी
आदिमाया कुलस्वामिनी
हीच वैष्णवी अन नारायणी
ललितागौरी, कमलासनी
सुघटा वरती शोभते
झेंडू फुलांची माळ॥ रुणझुण...॥३॥
महालक्ष्मी ही कोल्हापूरची
तुळजाभवानी तुळजापूरची
हीच रेणुका माहूरगडची
अर्धपीठ पर्वतशिखरी सप्तशृंगी देविका
(महिषासूर मर्दिनी)॥ रुणझुण...॥४॥
नवरात्रीच्या ह्या महोत्सवी
नवदुर्गांना नयनीसाठवू
शौर्य गाथा, त्यांची गाऊ
भक्तीभावे पूजिता आपण
देई हीच, सौभाग्याचे वरदान
भाग्याचे वरदान॥ रुणझुण...॥५॥

**- सुमती भिडे, पुणे.**
०२०-२५४४११६१

## भाषण जेव्हा केले...

भाषण जेव्हा केले घरी आरश्यासमोर।
तेव्हा कळले कुठल्या शब्दावर द्यावा जोर॥
आई माझी मार्गदर्शक आणि गुरू होती।
भाषणाचा कागद होता तिच्या हाती॥
जिवाचे रान करून केला होता सराव।
मग काय झाली पहिल्या नंबरची हाव॥
हावभाव, शब्दफेक आणि पाठांतर।
रात्रभर खपले होते निरंतर॥
जेव्हा सुरू झाली खरीखुरी स्पर्धा।
घाबरगुंडी उडाली नि जीव झाला अर्धा॥
प्रेक्षकांत कुठेच नव्हती माझी आई।
आशेने पाहत होत्या माझ्याकडे वर्गातल्या बाई॥
परीक्षकांनी जाहीर करायला सुरुवात केला निकाल।
जणू मैदानावर लढायला घेऊन गेले तलवार व ढाल॥
सांगायला सुरुवात केला पहिला नंबर थेट।
पहिला नंबर आला हीच मिळाली गोड भेट॥

**- करुणा भिडे, इ. ९ वी, डोंबिवली**

# नृत्यरूपी गणेश

- सौ. मिताली भिडे, रत्नागिरी.

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ।
निर्विघ्नं कुरुमे देव सर्वकार्येषु सर्वदा॥

ज्याची सोंड वळलेली आहे ज्याचे शरीर महाकाय म्हणजे विशाल आहे, सूर्याच्या कोटी किरणांप्रमाणे ज्याचे तेज प्रतिभाशाली आहे हे देवा गणेशा माझी सर्व कार्ये नेहमी निर्विघ्नपणे पार पडू देत. कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात आपण नेहमीच गणपती पूजनाने करतो. तसेच आम्ही आमच्या नृत्याची सुरुवात ही कायम गणेश स्तुतीने करतो. कार्यक्रमाच्या यशाकरिता, निर्विघ्नपणे पार पाडण्याकरिता केलेली ही प्रार्थना. गणपती हा हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक, प्रथम पूज्य व एक मुख्य देवता. भारतीय शिल्प व चित्रकलेत गणेश एक अत्यंत महत्त्वपूर्ण व लोकप्रिय देव आहे. गणपतीच्या नानाविध रूपांचे वर्णन पुराणात व इतिहासात मिळते. गणपती हा चतुर्भुज, द्विभुज व षड्भुज असतो. तसेच उजव्या व डाव्या सोंडेचा अशा रूपात दिसतो. हातात पाश-अंकुश वरदहस्त व मोदक असं मोहक रूप असतं. नृत्यगणेश हा आठ हातांचा व नृत्यरत असतो हाती शस्त्र नसते. मुद्राही नृत्यातील असते. गणेशमूर्ती तीन प्रकारे पाहायला मिळतात. १) आसनस्थ, २) उभ्या, ३) नृत्यरत.

मला स्वतःला गणपती खूप आवडतो. त्यामुळे नृत्यात त्याची विविध रूपे दाखविताना प्रत्यक्ष तो आपल्यात आहे असा भासही होतो. भरतनाट्यमच्या प्रत्येक नृत्यात शंकर-पार्वतीचा मुलगा गणपती, कार्तिकेयाचा भाऊ गणपती अशा गोष्टी सादर केल्या जातात. तसेच एकदंत हे नाव कसे पडले याचीही गोष्ट नृत्यामध्ये सादर केली जाते. गणपतीचे मोठे पोट, त्याला आवडणारे मोदक, दूर्वा, भरजरी पितांबर, उंदीर ज्याचं वाहन आहे अशा गणपतीचे नृत्यातून सुंदर वर्णनात्मक हस्त दाखविता येतात. नृत्याचं व गणपतीचं एक अतूट नातं आहे. कोकणातील गणपतीच्या नाचाची गाणी प्रसिद्ध आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील कोकणी बाल्यांचा गणपती नाच दमदार व लक्षवेधी असतो. पारंपरिक लोककलेत गणाने सुरुवात होते. 'पहिलं नमन आम्ही करितो वंदन।' तसेच 'गणपती आला आणि नाचून गेला' या नमनाने होते. भरतनाट्यम नृत्यामध्ये गणपती स्तुती, गणेश कौत्वम, कीर्तनम् अशा वेगवेगळ्या नृत्यांनी सुरुवात होते. सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती तसेच गणपतीच्या अनेक श्लोकांनीही नृत्याची सुरुवात केली जाते. ज्ञानेश्वरीतील नमनाची ओवी -

ओम नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥
देवा तुचि गणेशु। सकलमतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तीदासु। अपधारिजोजी॥

तसेच नामदेवांनी गणेश स्तवनाचा अभंग लिहिला आहे.

लंबोदर तुझा शोभे शुंडादंड।
करितसे खंड दुश्चिन्हांचा॥
चतुर्थ आयुधे शोभतसी हाती।
भक्ताला रक्षिती निरंतर॥

माझ्या नृत्याची सुरुवात मी तुलसीदासांच्या ह्या सुंदर अशा ओळींनी करते. अनेक अभंग आहेत त्यात गणपतीचं वर्णन आहे पण हा जास्त मनाला भावतो.

गाईये गणपती जगवंदना।
शंकर सुमन भवानिकंतंदन॥
तसेच संत रामदासांनी अभंगामध्ये
तांडव नृत्य करी गजानन

धिमिकिट धिमकिट वाजे मृदंग
ब्रह्मा ताल धरी गजानन

इतकं सुंदर वर्णन आहे. भरतनाट्यम् नृत्याचे वाद्य मृदंग. सुंदर मृदंग वाजतोय, ब्रह्मा ताल धरतोय आणि गणपती नृत्य करतोय. आहाहा ! असं सुंदर वर्णन चालू आहे. तसेच गणराज रंगी नाचतो, दाता तू गणपती, जयती जय गणपती गजानन अशा अनेकविध सुंदर गाण्यांवर नृत्य सादर केली जातात.

थोडक्यात मला असं वाटतं, नटांचा राजा नटेश्वर, हे शिवाचं शंकराचं रूप आहे अशाच शंकर-पार्वतीचा मुलगा गणेश, गजानन, गणपती याला गायन, वादनाबरोबरच नृत्यकलेचंही उत्तम ज्ञान होतं. नृत्यामध्ये गणपतीचं स्थान अग्रस्थानी आहे. त्यामुळे गणपतीलाही नृत्यकलेचं 'आद्यदैवत' मानतात.

## गणपतीची मूळ आरती

**समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेली गणपतीची प्रचलित आरती आपण म्हणतो ती फक्त दोन कडवी म्हटली जातात. पण मूळ आरती सात कडव्यांची आहे. ती खालीलप्रमाणे -**

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची॥
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची॥१॥
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पुरती॥ध्रु०॥

रत्नखचित फरा तुज गौरी कुमरा।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा॥
हिरेजडित मुकुट शोभतो बरा।
रुणझुणती नुपुरे चरणीं घागरिया॥जय०२॥

माथा मुकुट मणी कानी कुंडले।
सोंड दोंदावरी शेंदुर चर्चिले॥
नागबंद सोंड-दोंद मिराविले।
विश्वरूप तया मोरयाचे देखिले॥जय०३॥

चतुर्भुज गणराज बाही बाहुटे।
खाजयाचे लाडू करुनी गोमटे॥
सुवर्णाचे ताटी शर्करा घृत।
अर्पी तो गणराज विघ्ने वारीतो॥जय०४॥

छत्रे चामरे तुजला मिविती।
उंदीराचे वाहन तुजला गणपती।
ऐसा तू कलियुगी सकळीक पाहसी।
आनंदे भक्तासी प्रसन्न होसी॥जय०५॥

ता ता धि मि किट धि मि किट नाचे गणपती।
ईश्वर पार्वती कौतुक पाहती॥
ताल मृदंग वीणा घोर उमटती।
त्यांचे छंदे करुनि नाचे गणपती॥जय०६॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना॥
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवर वंदना ॥जय०७॥
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मनकामना पुरती॥ध्रु०॥

*समर्थ रामदासस्वामी रचित*

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे'चा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर त्या ग्रुपला नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची अधिकृत मान्यता नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.**

# हार्दिक शुभेच्छा

आदरणीय

कै. मुरलीधर पंढरीनाथ घुले

यांच्या स्मृतीस अभिवादन करून

समस्त घुले परिवाराकडून 'आम्ही भिडे' अंकास

## हार्दिक शुभेच्छा !

**श्रीमती शशी मुरलीधर घुले (भिडे)**

******

**श्री. महेंद्र मुरलीधर घुले**

**सौ. प्राची महेंद्र घुले**

******

**श्री. अंगद महेंद्र घुले**

**सौ. पूजा अंगद घुले**

******

**श्री. आदित्य महेंद्र भिडे**



**Jet Bill Pay**

# फंड्स ट्रान्सफर असो वा बिल पेमेंट आता सर्व काही घरबसल्या करा!

'जीपीआरएस' या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत जनता सहकारी बँकेच्या **'जेट बिल पे'** या IMPS ॲपद्वारे फंड्स ट्रान्सफरसह इलेक्ट्रीसिटी, टेलिफोन, मोबाईल, इत्यादी युटीलिटी बिल पेमेंट करण्याची सुविधा उपलब्ध.

**या ॲपमुळे मिळणारे इतर फायदे:**

- सुरक्षित व्यवहारासाठी 'Dual Pin Authentication'
- लाभार्थींचे तपशील सेव्ह करण्याची सुविधा
- ॲपसोबत एटीएम संदर्भातील विविध सेवा उपलब्ध

Google Play Store वर उपलब्ध



## जनता सहकारी बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९

रजिस्ट्रेशनसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.